अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : २७-३-२००४.

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा बुधवार दिनांक ३१-३-२००४ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शनिवार दि. १९-२-२००५ रोजी सकाळी ११=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००४-२००५ सालचे सुधारित व सन २००५-२००६ सालचे बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक ( स्कुल बोर्डासह ) मा.स्थायी समितीचे शिफारशी सह मंजूरीसाठी.
२. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १५-२-२००५.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शनिवार दि. १९-२-२००५ रोजी सकाळी ११=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय क्रमांक | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | १ | अंदाजपत्रकाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना देण्यांत आल्या आहेत.मा.स्थायी समितीच्या शिफारशी नुसार मंजूरीस शिफारस आहे. |
| २ | २ | टिप्पणी नाही. |

दिनांक :१५-२-२००५.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

## खास सभा ठराव क्रमांक - १.    दिनांक १९-२-२००५.

## खास सभेतील चर्चा.

दिनांक १९-२-२००५ रोजी अहमदनगर महानगरपालिकेची सन २००४-२००५ ची सुधारित व सन २००५-२००६ चे मुळ अंदाजपत्रकांवर चर्चा करण्यांसाठी सभेचे कामकाज सुरु झाले.सुरुवातीस श्री.मनेष साठे,सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रकांवरील त्यांचे मनोगत वाचुन दाखविले.त्यानंतर मा.महापौर यांनी अंदाजपत्रकावर मा.सदस्यांनी चर्चा करावी असे सुचविले. त्याचप्रमाणे २० फेब्रुवारीच्या आत महानगरपालिकेला कर आणि दर निश्चीत करणें आवश्यक असल्यांने जकात , घरपटटी आणि पाणीपटटी यावर चर्चा करावी असे सुचविले.

मा.श्री.कानडे : हेडवाईज चर्चा करण्यांस हरकत नाही.

मा.श्री.अनंत जोशी : मा.सभापती स्थायी समिती यांनी महापालिकेसमोर अंदाजपत्रक मांडलेले आहे.त्याबद्यल त्यांचे अभिनंदन करतो. तथापि उपनगर सावेडी विभागावर अन्याय झालेला असल्यामुळे सावेडी भुयारी गटार योजने बाबत माहिती द्यावी याबाबत वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. सावेडी भुयारी गटार योजनेसाठी भरीव तरतुद करण्यांत यावी.वर्षाअखेरीस जी शिल्लक दाखविलेली आहे,त्यातुन हि तरतुद करण्यांत यावी.तसेच वेळप्रसंगी कर्ज घेण्यांत यावे.व योजनेसाठी ३ कोटी ९० लाखाची तरतुद करावी अशी मागणी केली.

मा.श्री.मिलिंद गंधे : भुयारी गटार योजना सावेडी उपनगरासाठी आवश्यक बाब आहे. यासाठी बजेट तरतुद झाली पाहिजे.प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.सुरेश शेळके : घरपटटीचा विषय गहन बनलेला आहे.तो सोडविण्यांत यावा.सन १९८९ पासुन घरपटटी मध्ये १० पटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे. सन १९८५ ते १९९७ मध्ये २४ % कर संकलीत कर होता. सन १९९७ नंतर २७ % आकारणी करण्यांत आली.तेंव्हा घरपटटी अवास्तव वाढलेली असल्याने ही घरपटटी २७ % ऐवजी २१ % करण्यांत यावी.यातुन महानगरपालिकेला जी तुट येईल ती तुट महानगरपालिकेच्या ज्या शाळातील वर्ग खोल्या इतर संस्थांना भाडयाने देण्यांत आलेल्या आहेत ते भाडे ठरून आलेले असल्यामुळे त्याची वसुली दाखवुन भरुन काढण्यांत यावे.तसेच पाणीपटटीची वाढ झालेली आहे ती पाणीपटटी यापुर्वी आचारसंहितेमुळे मनपा कमी करु शकलेली नव्हती.ती पाणीपटटी रु. १५०० चे ऐवजी १२०० करण्यांत यावी.ही तुट स्कुल बोर्ड जागा भाडेमध्ये भरुन काढण्यांत यावी.

मा.श्री.सतिष मैड : यांनी आडतेबाजार येथील जड वाहतुकीला रस्ता बंद केल्याबाबत प्रश्न उपस्थित केला.व त्याबाबत खुलासा द्यावा अशी मागणी केली.त्याबाबत मा.आयुक्त यांनी त्यांना खुलासा दिला.व मा.महापौर यांनी स्वतंत्र बैठकीत विषय घेऊ असे सांगितले.श्री. संजय चोपडा म्हणाले की,हा विषय ज.बो.मध्ये घेण्यांबाबत यादी दिलेली आहे.

मा.श्री.दिपक सुळ : महानगरपालिकेला २० फेब्रुवारी पुर्वी कर आणि दर निश्चीत करणें आवश्यक आहे.घरपटटी जकात अनुदान ,पाणीपटटी मागील वर्षी हे विषय फेटाळले होते.जकात कर लावणें बाबत मानसिकता नाही.सभागृहाला विनंती करतो की,जकात लावण्यांत येऊ नये व हि तुट इतर मार्गाने भरुन काढावी. घरपटटी २७ % ऐवजी २१ % घेण्यांबाबत श्री.शेळके यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मी अनुमोदन देत आहे.घरपटटी बाबत डीमांड रजिष्टरे पुर्ण करण्यांत यावी.

मा.सौ.दहिफळे : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यांसाठी शहरांमध्ये जे मोबाईल टॉवर्स उभे केले आहेत त्यावर वन टाईम टॅक्स आकारणी करावी.

मा.श्री.नामदेव पवार : गेल्यावर्षी व चालु वर्षी अंदाजपत्रकीय तफावत पाहता गेल्यावर्षी जकात कर न लावताही बजेट मध्ये तुट आहे.व चालू वर्षी प्रशासन जकात कर लावण्यांचा प्रयत्न करीत आहे. व २४ कोटी रुपयाची वाढ केली आहे.नगर शहराचे जिव्हाळयाचे प्रश्न घरपटटी,पाणीपटटी व जकात आहे.घरपटटीच्या आकारणीमध्ये नागरिकांना जवळ जवळ ३० ते १०० पट वाढ झालेली आहे. त्यामुळे घरपटटीची फेर रचना करावी. व सन १९८९ - ९० हे साल पायाभुत धरुन जास्तीत जास्त २ ते ३ पट वाढु शकेल.पाणीपटटी पुर्वी २४० होती त्यानंतर ती ४८० झाली व त्यानंतर पुन्हा ८०६ व ८०६ वरुन १००६ इतकी पाणीपटटी करण्यांत आली.तेंव्हा पाणीपटटी रु.१२०० करण्यांत यावी व त्यामधुन येणांरी तुट ही श्री.शेळके व श्री.सुळ यांनी सुचविल्याप्रमाणे शाळाभाडे मधुन भरुन काढण्यांत यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव : घरपटटी मध्ये १९८९ - ९० पासुन वाद सुरु झालेला आहे.सन १९९४ - १९९५ मध्ये रिव्हीजन करतांना चुकीची मोजमापे घेतलेली असुन त्यामध्ये जीना,संडास ,व्हरांडा इत्यादी धरण्यांत आले आहे त्यावर आकारणी करु नये.त्याचप्रमाणे घरपटटी २१ % करावी.मंदिर मस्जिद व धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी असलेले कर माफ करण्यांत यावे.सन १९८९ - ९० चे समितीपुढे जी प्रकरणे निकाली निघाली त्याबाबत दि.१३-१२-२००१ चे ठरावात दुरुस्ती करावी व आपणांस असलेले अधिकाराचा वापर करावा.पाणीपटटी जादा आहे रुपये १००० करावी सर्व वसुल होईल.कनेक्शन देण्यांचे नियम शिथील करावेत.वसुल जास्तीत जास्त होऊ शकेल व मनपाच्या उत्पन्नात भरच पडेल.जकाती बाबत बोलतांना श्री.कृ.द.जाधव म्हणाले की,जकात कर लावण्यांस आमचा विरोध आहे.पण बाजारपेठ नाही.तालुक्याच्या ठिकाणी सुध्दा आता बाजारपेठ झालेली आहे.जकातीचा बोजा नागरिकांवरच पडेल.जकात लावण्यांबाबत शासनाचे नगरपालिकेवर बंधन नाही.जकातीमध्ये २४ कोटी अपेक्षित धरलेले आहे.तथापि जकात न लावता ६ कोटी ३० लाख फक्त कमी होणांर आहे.अंदाजपत्रकाचे आकडे फुगविलेले आहे. वास्तविक बजेट ५५ कोटीचेच आहे.न.पा.शिक्षण मंडळाकडील इमारतीच्या जागांवर भाडे आकारणी करुन तुट भरुन काढण्यांसारखी आहे. भाडे आकारणी साठी चार वर्ष लागले वसुलीसाठी ८ वर्ष लागणांर काय ?

मा.श्री.कानडे : श्री.मनेश साठे सभापती स्थायी समिती यांचे विचार महत्वपुर्ण आहे.सामान्य माणसाशी वचनबध्द आहे.मात्र मुलभूत प्रश्नावर अंदाजपत्रकामध्ये चर्चा झाली पाहिजे. हद्यवाढीच्या भागामध्ये पिण्यांचे पाणी ड्रेनेज गटार,स्मशानभुमी इत्यादी प्रश्न प्रलंबित आहे व त्यांची अवस्था भयानक आहे.बजेट मधील तरतुदीबाबत काय ? स्मशानभुमी बाबत काय याबाबत प्रशासन व महानगरपालिकेला वेळेवेळी निवेदन दिलेले आहे.घरपटटी २७ % वरुन १० % कमी करुन १७ % करण्यांत यावी.पाणीपटटी १२०० रुपये करण्यांत यावी.जकात कर लागु करु नये व योग्य भुमिका घेण्यांत यावी.उपनगरासाठी अंदाजपत्रकामध्ये तरतुद नाही झिरो तरतुद आहे.अंदाजपत्रकामध्ये

नविन रस्त्यांवर ३ कोटींची तरतुद करण्यांत आली होती.चालु वर्षी मात्र या हेडवर झिरो तरतुद दाखविली आहे.तरी त्यावर १ कोटी ५० लाखाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.गिरवले : त्सुनामीग्रस्तांसाठी नगरसेवकांचे दोन महिन्याचे मानधन द्यावे.अशी सुचना मांडली.पुढे बोलतांना सांगितले की,जकात,घरपटटी व पाणीपटटी सन १९८९ नंतर घरपटटीत वाढ झालेली आहे.सन १९९४-९५ चे रिव्हीजन चुकीचे झालेले आहे.महानगरपालिकेला कर ठरविण्यांचे अधिकार आहे.नविन रिव्हीजन करावे.लोकन्यायालयामध्ये ज्या केसेस दाखल झालेल्या आहेत त्यामध्ये न्यायालयात तडजोडी करण्यांपेक्षा मनपाने तडजोडीने प्रश्न मिटविणें शक्य आहे.वसुली बाबत वसुलीची रजिष्टरे पुर्ण झालेली नाहीत.रिव्हीजन चुकीचे झालेले आहे. २७ % आकारणी केली आहे.ती फार जास्त आहे.शिवाय यामध्ये शिक्षण कर ,वृक्षकर,रोजगारहमी कर,असे एकुण १२ % ने वाढ होऊन हा कर ३९ % वर पोहचतो. व ती मनपा वसुल करते.तरी टॅक्स रेट १० % ने कमी करुन होणां-या नुकसान थकबाकीतुन वसुल होऊ शकेल.शहरातील बरेच हॉटेल,पेट्रोल पंप,मंगलकार्यालये यांना मोठया प्रमाणांवर घरपटटी बाबत मागील आयुक्त श्री.सानप व हिरे यांनी आश्वासन दिले होते.तरी घरपटटी कमी करावी आपण पाणी व्यवस्थीत देतो का ते पहावे व पाणीपटटी रु.१२०० करावी.जकात प्रश्नाबाबत औद्योगिक वाढी बाबत शहराचा विचार केला असता औद्योगिक वाढ खुंटलेली आहे.नविन जकात कर आकारणी केली तर उद्योगधंदे उधवस्त होण्यांची शक्यता आहे.क वर्ग व ब वर्ग नगरपालिकांमध्ये जकात कर नाही.त्यामुळे मनपाच्या हद्दीमध्ये किंमतीमध्ये मोठी तफावत व वाढ होईल.जकात कर लागु न करण्यांबाबत नगरचे आमदार मा.अनिल भैय्या राठोड यांनी जनतेला आश्वासन दिले होते.त्याबद्यल त्यांचे आभारच मानले पाहिजे. यामध्ये विकास कामे रखडली तरी चालतील.विकासकामे थोडे दिवस थांबवावेत असे सुचविले.मात्र भविष्यकाळ उज्ज्वल राहणांर आहे.

मा.सौ.वर्षा अरिफ : जकात,पाणीपटटी व घरपटटी हे प्रश्न महत्वाचे आहेत.पिंपरी चिंचवड येथे वॉटरपार्क करुन उत्पन्न वाढविले आहे,त्याचा विचार करावा.

मा.श्री.सुरेश शेळके : घरपटटी ,पाणीपटटी कमी करण्यांत येणांर आहे.व जकात लावण्यांत येणांर नाही.घरपटटी मध्ये २.७६ कोटी रुपये पाणीपटटी ३०० रुपयांनी कमी केल्यांने १.३७ कोटी रु.तुट होईल व जकातीबाबत जुन पासुन अनुदानांत तुट होणांर असल्यांने साडेचार कोटी रुपये रक्कम तुटीची असणांर आहे.सध्या स्कुल बोर्डाकडील ज्या शाळा इमारती जागा भाडयाने दिलेल्या आहेत, त्यामध्ये भाडयाचे उत्पन्न साडेचार कोटी उत्पन्न बाजुला धरता येऊ शकेल. अनाधिकृत नळ कनेक्शन वसुली ७० लाख धरता येईल.जाहिरात बोर्डाचे उत्पन्न ७० ते ८० लाख धरता येऊ शकेल त्याचप्रमाणे जकात लागु केल्यामुळे खर्च बाजुला जी ५० लाख रुपयाची तरतुद करण्यांत आली आहे ती आपोआपच कमी होऊ शकेल. त्यामुळे याची तोंडमिळवणी होण्यांस मदत होईल.

मा.श्री.संजय चोपडा : अहमदनगर शहराचा विकास फक्त जकतीमूळेच खोळंबलेला आहे असे नाही.अहमदनगर शहरात बरेच उद्योगधंदे नाहीत.शहराच्या विकासाचे गाजर दाखवुन जकात लावण्यांचा प्रयत्न आहे.शहराच्या हद्दीबाहेर जकात लागु नाही.त्यामुळे जकात उत्पन्नात घटच येणांर आहे.सध्या जकाती ऐवजी टर्न ओव्हर टॅक्स लागु आहेच. त्याचप्रमाणे केंद्रशासनाचे वतीने व्हॅट ही लागु होणांर आहे.मागील वेळी जकातीचा ठरावही फेटाळला गेला होता.मागील वेळी विकासकामी दाखविलेले बी.ओ.टी.प्रकल्प झालेले नाही.नगर शहर हे व्यापाराचे केंद्रस्थान आहे हे लक्षात घ्यावे.

मा.श्री.संदिप कोतकर : केडगांव येथे चार - चार पाच - पाच दिवस पाणी येत नाही. तेंव्हा पाणीपटटी ही १,००० रु.करावी.ज्याप्रमाणात पाणी दिले जाते त्याचप्रमाणात पाणीपटटी आकारावी.उपनगरासाठी फक्त ५०० रुपये घरपटटी करावी.घरपटटी १० ते १२ हजार लावण्यांत आलेली आहे.तेथील भौगोलिक परिस्थिती पहावी.त्यांना सुविधा नाहीत,रस्ते नाहीत.केडगांव साठी अंदाजपत्रकात भरीव तरतुद करण्यांत यावी.अंदाजपत्रकातील जकात पडणांर नाही.उत्पन्नाचे इतर स्त्रोत पहावे.

मा.श्री.त्रिपाठी : जकात प्रश्नांस विरोध आहे.माजी केंद्रिय मंत्री श्री.दिलीप गांधी,त्याचप्रमाणे मा.आमदार श्री.अनिल भैय्या राठोड यांनी जी भुमिका घेतली त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो.अहमदनगर महानगरपालिका स्थापन झाली त्यावेळी शासनाने एक पैसाही उपलब्ध करुन दिलेला नाही. मात्र हद्यवाढीतील बारा गावांवर तेरा कोटी रु.खर्च झालेले आहे. हद्यवाढीतील विभागातुन उत्पन्न मात्र खुपच कमी आहे.जकात प्रश्नांबाबत व्हिडीओकॉन,कायनेटीक यासारखे प्रकल्प स्थलांतर करीत आहे. व तालुक्यांतुन व्यापार सुरु झालेला आहे.त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेचा जकातीचा हेतु सफल होणांर नाही. त्यामुळे इतर मार्गांनी उत्पन्न वाढविणें आवश्यक आहे. जकात करास विरोध आहे.

मा.श्री.संजय चोपडा : सांगली महानगरपालिकेने कर्ज काढून मोठी कॉम्प्लेक्स निर्माण केलेली आहेत.त्याबाबत सविस्तर माहिती घ्यावी.स्कुल बोर्ड जागांबाबतचे भाडे जमेस धरावे.जळगांव महानगरपालिके प्रमाणे नविन मोबाईल टॉवरवर टॅक्स घेण्यांत यावा.नविन जाहिरात बोर्ड शोधुन त्यावर टॅक्स आकारणी करावी.त्याप्रमाणे कॅन्टोन्मेंट प्रमाणे टोल टॅक्स आकारणी करावी.

मा.सौ.डॉ.सत्रे : श्री.सुरेश शेळके यांनी केलेल्या सुचनेस अनुमोदन देत आहे. पुणे महापालिकांमध्ये संकलीत कराची आकारणी २० % आहे.नाशिक मध्ये १५ % आहे.औरंगाबाद मध्ये २० % आहे. त्याप्रमाणे आकारणी करावी.

महिला बाल विकास कामांकरीता सदर अंदाजपत्रकांमध्ये २ लाखाची तरतुद करण्यांत आली आहे. ती तरतुद अपुरी असुन रु.५ लाखापर्यंत तरतुद करण्यांत यावी.त्याचप्रमाणे मनपामध्ये मालमत्तेवर नोंदणी फी ५०० रु. ऐवजी १००० करावी.

मा.श्री.मिलिंद गंधे : पाणीपटटी १२०० रुपये घेण्यांत यावी.घरपटटी,संकलीत करामध्ये १० % सुट देण्यांत यावी.जकातीचा ऊहपोह याआधी झालेला आहेच.भा.ज.पा.ची जकात लावु नये अशी भुमिका आहे.महाराष्ट्र शासनांने अहमदनगर महानगरपालिकेस कोणतेही अनुदान दिलेले नाही.तेंव्हा महाराष्ट्र शासनांने अहमदनगर महानगरपालिकेस ५० कोट रुपयांचे अनुदान द्यावे.

मा.सौ.मंगला गुंदेचा : महानगरपालिकेने अनुदानांसाठी प्रयत्न करावे.

मा.श्री.आसाराम कावरे : नागरिकांना दिलेली आश्वासने पाळणे बंधनकारक आहे.घरपटटी पाणीपटटी कमी झाली पाहिजे.शहर सुधारणा झाली पाहिजे.यासाठी जकात कर लागु करावा.व ज्याठिकाणी ५०० चे वर कामागार आहे,त्याठिकाणी दोन वर्ष जकात आकारु नये.केंद्र शासन व राज्य शासनांकडुन रु.५० कोट प्रत्येकी अनुदान घ्यावे.लुना कंपनीला पाणीपुरवठा करण्यांत यावा.

मा.श्री.अभय आगरकर : आज श्री.मनेश साठे सभापती स्थायी समिती यांनी महानगरपालिकेला जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे,त्याबद्यल त्यांना मी धन्यवाद देतो.विकास योजनेचे अंदाजपत्रक सादर

केलेले आहे.अंदाजपत्रकांमध्ये काही विषय संभ्रमामध्ये टाकणांरे असतात किंवा वास्तवापासुन दुर जाणांरे असतात.समाज टिकला तर संस्था टिकु शकतात.ऑक्ट्रॉय,पाणीपटटी घरपटटी कमी करावी.याबाबत समन्वय साधला गेला पाहिजे.तसेच अंदाजपत्रकांत होणांरी तुट भरुन काढता येईल असे चित्र उभे केले गेले पाहिजे.त्याकरीता वास्तवामध्ये संघर्ष करावा लागेल.निर्णय कटु असतात अंदाजपत्रकामध्ये विविध विकास कामांसाठी तरतुद केलेली आहे.ऑक्ट्रॉय कमी करावयाचा असेल तर पवनउर्जा प्रकल्प झाला पाहिजे.पवनउर्जा प्रकल्पासाठी तरतुद करावी.यामधुन दरवर्षी ४ ते साडेचार कोटीचा फायदा होईल.व पवनउर्जा प्रकल्प झाला पाहिजे.त्यामुळे एम.एस.सी.बी.च्या बिलाचा मेळ बसु शकेल.याप्रकल्पास प्राधान्य देणें ही काळाची गरज आहे.तथापि या कामी गती मिळालेली दिसुन येत नाही.पाठपुरावा करणें आवश्यक आहे.

जनुभाऊ काणे विकास योजना ३९ लाखाचे अनुदान असतांना कार्यवाही झाली नाही.उत्पन्न देणांरे प्रकल्पांना प्राधान्य देण्यांत यावे.घरपटटी जाचक आहे.योग्य तो निर्णय घ्यावा.मात्र पाणीपटटी दर तोच ठेवला तरच योजना चालु राहिल.या योजनेतुन पाणी रोजचे रोज द्या मात्र पटटी कमी करु नका.संस्था चालली पाहिजे,वास्तवाचे भान ठेवले पाहिजे.ऑक्ट्रॉय कर लावण्यांत येवू नये,घरपटटी ६ ते ७ % कमी करावी.पाणी पटटीचे दर कायम ठेवावेत.

मा.श्री.दिप चव्हाण : आजच्या सभेला नागरिक प्रेक्षक गॅलरीमध्ये अहमदनगरचे लोकप्रिय आमदार मा.श्री.अनिल भैय्या राठोड हे या ठिकाणी उपस्थित आहेत त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो.तसेच महापौर आणि महापालिका प्रशासन यांनी जे अंदाजपत्रक सादर केले आहे, ते अ,ब,क,या मध्ये सादर केले त्याबद्यलही त्यांचे अभिनंदन करतो.मागील सन २००२-२००३ चे बजेट जिल्हाधिकारी यांनी ४८ कोटीवरुन ७० कोटीवर व सन २००४-२००५ चे ७५ कोटी वरुन २००५-२००६ चे ७९ कोटी ३४ लाखाचे बजेट सादर केले आहे.आकडेवारी फुगविलेली आहे. सन १९९९ पासुन जकात बंद झालेली आहे.व असे असतांनाही चुकीचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे काय ? मागील वर्षीही बजेट मध्ये २४ कोटीची तुट होती.फुगविलेले बजेट ५४ कोटी वरुन ७९ कोटीवर गेले आहे.मागील वर्षी जकात बंद होती.त्यामुळे बजेट हे ४९ कोटी एवढेच आहे,त्यात कोणतीही तुट नाही.

जकात बंद झाली तरी ६६ % अनुदान २ वर्षे मिळणांर आहे.शासन अनुदान बंद करु शकत नाही.त्याचप्रमाणे शासनाकडे महानगरपालिकेचे ३१ कोटी रुपये येणे आहे.त्यामध्ये विविध महागाई भत्ता अनुदान थकबाकी पाचव्या वेतन आयोगाचा अनुदान,रस्ते अनुदान,इ.मुद्रांक शुल्क बेवारस रस्ता अनुदान इ.जकात अनुदान बंद झाल्यास व शासनाने ९ कोटी दिल्यास तुट भरुन निघु शकेल.अनुदान मिळण्यांसाठी प्रयत्न करावयास हवे.शासनांकडुन मिळणांरे अनुदान दरवर्षी मिळत नाही,त्यामुळे तुट ये आहे.जकात करामुळेच प्रगती थांबते असे म्हणणे कितपत योग्य आहे.मागे जकात असतांना कितपत विकास झाला, मागील वर्षी महानगरपालिकेच्या उत्पन्नांमध्ये संकलीत कर ९ कोटी अपेक्षित असतांना २ कोटी ७२ लाख वसुल झाले.पाणीपटटी ८ कोटी ३० लाख असतांना २ कोटी मिळाले.गाळा व इतर भाडे १ कोटी २० लाखअसतांना फक्त ५८ लाख मिळाले.

मागील अपेक्षित उत्पन्न उदा.घरपटटी वसुल होत नसेल तर त्याबाबत कोणांवर काय कारवाई होऊ शकते ते स्पष्ट करावे.बी.पी.एम.सी.ॲक्ट मध्ये महानगरपालिका कायद्यामध्ये जकात कर हा ऐच्छिक कर आहे.संकलीत कर कमी झाला पाहिजे.रेटेबल व्हॅल्यु कमी करणें बाबत ज्या ७२ हजार मिळकती आहेत त्यामध्ये रेटेबल व्हॅल्यु ४६ कोटीवर संकलीत कर १२ कोटी ४२ लाख आहे.६ वर्षाची थकबाकी १०० कोटीवर जाते.त्यामुळे घरपटटीचे दर ( रेट ) कमी केल्यास १०० % वसुली होऊ शकते.त्यामुळे १२ कोटी ४२ लाख अपेक्षित पैकी ३० % कमी म्हणजे १०.१० कोटी वसुल होऊ शकेल.त्यामध्ये १.४२ कोटी फक्त तुट होऊ शकेल.

सर्व विकास कामे बाजुला ठेवावी.रेटेबल व्हॅल्यु ३० % कमी करावी.पाणीपटटी १५०० वरुन ३०० ने कमी करुन १२०० रुपये करावी.पाणीपटटी बाबत मागील वेळी केलेला ठराव शासनाने रद्य केलेला आहे.

अंदाजपत्रकामध्ये ४ कोटी शिल्लक दाखविलेले आहे.त्यामध्ये कायनेटीक कंपनीचे पैसे कोर्टामध्ये शिल्लक दाखविलेले आहे ते खर्च करता येणांर नाही.

मा.श्री.सतिष मैड : जड वाहतुकीबाबतचा प्रश्न निर्माण केला.

त्यांनतर खालील सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

श्री.गारुडकर,सौ.मुदगल,श्री.कृ.द.जाधव,

मा.श्री.गिरवले : घरपटटी बाबत १९९५,१९९७ चा वाद न्यायालयात गेला आहे.त्याबाबत तोडगा काढावा व घरपटटी कमी करावी.क्रिडा संकुलाबाबत काही तोडगा निघालेला नाही.संपुर्ण प्रोजेक्ट ताब्यात घ्यावा.

मा.श्री.शेख मुद्यस्सर : घरपटटी कमी होत नसेल तर फकीरवाडयाला परत ग्रामपंचायत करावी.

मा.श्री.आगरकर अभय : अहमदनगर शहरातील पांजरापोळ ही संस्था अनाथ अश्रित जनावरांचे पालन पोषण व संगोपनाचे कार्य करीत असल्याने सदर संस्थेस महानगरपालिकेच्यावतीने लावण्यांत येणारे टॅक्स लावु नयेत असे सांगितले.

शेवटी मा.महापौर यांनी आभारप्रदर्शन करतांना सांगितले की,ब-याच मा.सदस्यांनी अंदाजपत्रका बाबत ऊहापोह केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिप्रेत असलेल्या चांगल्या प्रथांचा पायंडा पाडलेला आहे. व सर्वांनी चांगले मुद्ये मांडलेले आहे.करीता जकात कर प्रस्ताव रद्य करण्यांत येत आहे.त्याचप्रमाणे सविस्तर बजेट सादर करुन मंजुर करावे असे श्री.दिपक सुळ यांनी सांगितले.त्यानंतर मा.महापौर यांनी घरपटटी २७ % ऐवजी २१ % करण्यांत येत आहे.तसेंच सध्या असलेली पाणीपट्टी रु.१५०० ऐवजी रु.१२०० करण्यां येत असुन,सदरचे दर दि.१ एप्रिल २००५ पासुन लागु होतील असे सांगितले.मात्र आगरकर यांनी सांगितले की,सावेडी विभागात भुयारी गटारी योजनेसाठी तरतुद करण्यांत यावी. मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की,ज्या ठिकाणी व्यापारी वापर असेल ते क्षेत्र वगळुन मंदिर मस्जिद चर्च यांना घरपटटी माफ करण्यांत यावी  चर्चा समाप्त.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्र.१** **दिनांक १९-०२-२००५.**

.................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर सन २००५-२००६ चे अंदाजपत्रकासोबत मा.स्थायी समितीस सादर केलेले प्रस्ताव.

-- * --

प्रस्ताव क्र.१ आरोग्य विभाग
सेप्टीक टँक सफाई सेवा शुल्क दरात वाढ करणे बाबत.
प्रस्ताव क्र.२आरोग्य विभाग
इतर आरोग्य विषयक ना हरकत दाखला देणेबाबत फी मध्ये नवीन तरतुद करणेबाबत.
प्रस्ताव क्र.३ वसुली विभाग
दिवाबत्ती कर रद्य करणेबाबत
प्रस्ताव क्र.४ मार्केट विभाग
रस्ता मांडणी फी दरात बदल करणे बाबत.
प्रस्ताव क्र ५ मार्केट विभाग
पे ॲण्ड पार्क योजना दर निश्चितीबाबत
प्रस्ताव क्र. ६ आरोग्य विभाग ( घनकचरा विभाग )
सार्वजनिक ठिकाणी आरोग्य विषयक तरतुदींचा भंग केल्याप्रकरणी दंड आकारणे.
प्रस्ताव क्र.७ पाणीपुरवठा विभाग
अनधिकृत नळ कनेक्शनचे दंडात बदल करणेबाबत.
प्रस्ताव क्र.८ पाणीपुरवठा विभाग
पाणी पुरवठा थकित विज बिलात सवलत मिळणेबाबतची योजना.

प्रस्ताव क्र.१ आरोग्य विभाग
विषय : सेप्टीक टँक सफाई सेवा शुल्क दरात वाढ करणे बाबत.
सादर,

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात ज्या भागात भुयारी गटार योजना सुविधा उपलब्ध नाही. अशा भागात नागरिकांनी मैला - पाणी यांची विल्हेवाट लावण्यासाठी स्वत:चे सेप्टीक टँक बांधुन सुविधा करून घेतली आहे. प्रत्येक सेप्टीक टँक वर्षातुन कमीत कमी एक वेळेस साफ करून घ्यावा लागतो.

वरील प्रमाणे असणारे खाजगी सेप्टीक टँक साफ करून घेणेबाबत नागरिकांचे आलेल्या मागणी अर्जानुसार शुल्क आकारणी करून महानगरपालिकेच्या असणा-या व्हॅक्युम मशीनद्वारे साफ केले जातात.

सेप्टीक टँक सफाई करणेसाठी मा.नगरपरिषद ठराव नं.३१ दिनांक २७-२-२००१ नुसार खालील प्रमाणे सेवाशुल्क घेण्यात येते.

मनपा हद्यीमध्ये एका खेपेसाठी - रू.१५० /-
मनपा हद्यीबाहेर एका खेपेसाठी - रू. ३०० /-

सेप्टीक टँक सफाई करीता म.न.पा.ला सध्या खालीलप्रमाणे खर्च येतो.

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचा-यांचा पगारावरील खर्च ( एक वाहनचालक दोन बिगारी ) | रू.४,०३,१७६ /- |
| २ | डिझेल खर्च | रू.२,१६,००० /- |
| ३ | ऑईल खर्च | रू. ३,००० /- |
| ४ | दुरूस्ती व देखभाल खर्च | रू. २५,००० /- |

| | | |
|---|---|---|
| ५ | टायर टयुब खर्च | रू.   ७५,०००/- |
| | एकुण खर्च | रू. ७,२२,१७६ /- |

व सेप्टीक टँक पासुन वर्षाला अपेक्षित उत्पन्न रू. १,४०,००० /- आहे.

वरील जमाखर्चाचा तपशील पाहता रू.५,८२,१७६ /- ची तफावत आढळुन येते.

तरी नमुद केलेल्या सध्याचे सेवाशुल्क दरांत वाढ केल्यास सदरची तुट काही प्रमाणात कमी होवु शकेल.

तरी खालील प्रमाणे दरवाढ केल्यास रू.२,००,००० /- पर्यंत अपेक्षित उत्पन्न मिळु शकेल.

| | सध्याचा दर | सुधारित दर |
|---|---|---|
| म.न.पा.हद्दीमध्ये | १५० /- | २५० /- |
| म.न.पा.हद्दीबाहेर | ३०० /- | ४५०/- |

वरील प्रमाणे दरवाढ करणेस विचारार्थ सादर.

प्रस्ताव क्र.२ आरोग्य विभाग

विषय : आरोग्य विभागाकडुन देण्यात येणा-या " इतर आरोग्य विषयक ना हरकत दाखला " देणेबाबत फी मध्ये नवीन तरतुद करणेबाबत.

सादर,

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात असणारे लॉजिंग,परमीट रूम,सिनेमा थिएटर,व्हिडीओ हॉल,सर्कस,फनफेअर,बिगरशेती परवाना इत्यादींना आरोग्यविभागाकडुन आरोग्यविषयक ना हरकत दाखला मा.महानगरपालिका विशेष सभा ठराव नं. १ दिनांक ३१-३-०४ नुसार फी मध्ये वाढ करण्यांत आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | लॉजिंगकरीता ना हरकत दाखला फी | रू.२,००० /- |
| २ | परमीट रूमकरीता ना हरकत दाखला फी | रू.२,००० /- |
| ३ | बिगर शेती  ना हरकत दाखला फी | रू. १,००० /- |
| ४ | सिनेमाथिएटर / व्हिडीओ हॉल ना हरकत दाखला फी | रू. १,००० /- |
| ५ | सर्कस फनफेअर व इतर मौजमेळावा ना हरकत दाखला फी | रू. १,००० /- |

या व्यतिरिक्त सध्या नव्याने सॅनिटेशन दृष्टया बांधकाम परवानगीसाठी ना हरकत दाखल्यासाठी मागणी येत आहे. यास्तव " इतर आरोग्य विषयक ना हरकत दाखला " असे शिर्षक फी आकारणीसाठी अंदाजपत्रकात तरतूद करणेसाठी व फी रूपाने प्रत्येक दाखला देण्यासाठी रू.१००० /- शुल्क आकारणे करणे उचित वाटते.

विचारार्थ सादर.

प्रस्ताव क्र.३ वसुली विभाग

सादर,

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, दि.१-७-९९ पासुन केडगाव ,नागापुर,बोल्हेगाव,फकीरवाडा,बुरूडगाव इत्यादी ग्रामपंचायती नगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. सदर ग्रामपंचायतीच्या प्रचलित दरानुसार संकलीत कर,पाणीपट्टी ,स्पे.सेस , दिवाबत्ती कर इत्यादी करांची आकारणी करण्यात येत असे. दिवाबत्तीची वसुली खालील प्रमाणे केली जात आहे.

| अ.नं. | उपकार्यालयाचे नांव | सध्या अस्तित्वात असलेले दर | सन २००३-२००४ अखेर थकबाकी. |
|---|---|---|---|
| १ | केडगाव | रूपये ६० /- | रू.२,००० /- |
| ३ | बिगर शेती ना हरकत दाखला फी | रू. १,००० /- | रू. १,००० /- |
| ४ | सिनेमाथिएटर / व्हिडीओ हॉल ना हरकत दाखला फी | रू. १,००० /- | रू. १,००० /- |
| ५ | सर्कस फनफेअर व इतर मौजमेळावा ना हरकत दाखला फी | रू. १,००० /- | रू. १,००० /- |

**प्रस्ताव क्र. ४ -- रस्ता मांडणी फी दरात बदल करणे बाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर :** अहमदनगर शहरामध्ये व उपनगरामध्ये वेगवेगळया चौकामध्ये रस्त्यांच्या कडेला भाजीपाला विक्रेते फळ विक्रेते तसेच इतर खाद्यपदार्थ विक्रेते, लहान व्यावसायिक ,हातगाडीवाले व्यवसाय करतात.

नगरपरिषद खास सभा ठराव क्र.३ दिनांक २६-२-२००३ अन्वये मार्केट विभागाकडील रस्ता बाजु फी प्रत्येकी रू.५-०० चे दराला मंजुरी दिलेली आहे व त्यानुसार सध्या रू.५-०० या दराने वसुली केली जात आहे.

माहे एप्रिल २००४ ते सप्टेंबर २००४ अखेर रूपये ४,५०,९९७-०० इतकी रस्ता बाजु फी वसुली झाली आहे. रस्ताबाजु वसुल करतांना जागेचे मोजमाप ठरवुन दिलेले नसल्याने अडचणी निर्माण होतात. काही व्यावसायीक रस्त्याचे बाजुला २० ते २५ फुटापर्यंत जागेचा वापर करतात. मात्र रस्ता बाजु फी म्हणुन रू.५-०० वसुल होतो. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.

सध्या अमरधाम रोड,वाडियापार्क,चितळेरोड,दिल्लीदरवाजा,मंगलगेट,सर्जेपुरा ,गंजबाजार व इतर ठिकाणी रस्त्याच्या बाजुला भाजीपाला,फळे ,इतर खाद्यपदार्थ व वस्तु यांची विक्री होत असल्याने त्याचा रहदारीसही अडथळा,अडचणी निर्माण होतात. त्यासाठी महानगरपालिकेचे नगर रचना विभागामार्फत जागेबाबत नियोजन करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत भाजीविक्रेते व छोटे दुकानदार रस्त्यापैकी जास्त जागा वापरत असल्याने प्रत्येक भाजीविक्रेत्यास जागेचे क्षेत्रफळ निशिचत करून त्याप्रमाणे प्रत्येक चौरस फुटाचा दर रू.१-०० आकारल्यास महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच आवश्यकतेपेक्षा जास्त जागा वापरण्यास आळा बसेल.

तरी सदर बाबत दर स्क्वे.फुटास निश्चित करणेबाबत आदेशार्थ सादर.

सदरबाबत मा.उपायुक्त (कर) यांचा अहवाल की, उपरोक्त प्रस्तावाप्रमाणे सदर व्यावसायीक आवश्यकतेपेक्षा जास्त जागेचा वापर करीत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो.त्यास आळा घालण्यासाठी प्रति चौ.फुट या प्रमाणात फी वसुल केल्यास आवश्यक जागेच्या वापरास

आळा बसेल. व मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल. सबब प्रति चौ.फुटास ०.५० इतकी फी किमान रू.१०/- वसुल करणे योग्य व त्याकरीता प्रस्ताव मान्यतेकरीता मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे योग्य.

त्यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, फेरीवाले यांचेकडुन सध्या मंजुर दराने फी वसुल करणेस हरकत नाही. फक्त फेरीवाले व हातगाडे यांना फीरत (Mobile) राहण्याची अट घालुन तिचा अंमल करणे आवश्यक.रस्ता मांडणी फी लावुन शहरातील रस्त्यावरील व्यावसायीक यांचे रहदारीचे व वाहतुकीस अडथळा निर्माण होवु नये म्हणुन नियोजन करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव " अ " मान्यता देणेस हरकत नाही.

वरील प्रमाणे प्रस्ताव मा.महानगरपालिका ठराव नं.८ दि.२०-११-२००४ अन्वये मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविला असता त्यावर साधक बाधक चर्चा होवुन ठराव करण्यांत आला की, उपरोक्त विषयावर सांगोपांग चर्चा झालेनंतर विषय तहकुब करणेत येवुन सदरचा विषय पुढील वर्षाचे अंदाजपत्रकाचे वेळी घेण्यात यावा.

तरी मा.महानगरपालिका ठराव क्र.८ दि.२०-११-२००४ अन्वये सदरचा विषय पुढील वर्षाचे अंदाजपत्रकाचे वेळी घेणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

**प्रस्ताव क्र. ५ : पे ॲण्ड पार्क योजना दर निश्चिती बाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर :** दि.१९-१०-२००४ रोजीच्या कोऑर्डिनेशन मिटींग बाब क्र.२ नुसार शहरात पे ॲण्ड पार्क ठिकाणे निश्चित करण्यासाठी कोल्हापुर,जळगाव,नाशिक व औरंगाबाद या महानगरपालिका यांची नियमावली व दरपत्रक जा.क्र.मार्केट २८१७ दि.९-११-०४ अन्वये फॅक्सद्वारे मागविली असता जळगांव मनपाने नियमावली तयार करावयाचे काम चालु आहे असे दुरध्वनीवर सांगितलेले आहे. तथापि अद्याप माहिती मिळाली नाही. औरंगाबाद महानगरपालिकने पे ॲण्ड पार्क साठी जागा उपलब्ध नसल्याने कोणतीही नियमावली तयार केलेली नाही असे दुरध्वनीद्वारे सांगितले आहे. तसेच कोल्हापुर महानगरपालिकेने दि.२ डिसेंबर २००४ च्या फॅक्सद्वारे शर्तीची यादी व वाहनतळ मक्ता पध्दतीचे द्यावयाचे जाहिर प्रसिध्दीकरणाच्या प्रती पाठविल्या आहेत. सदर महानगरपालिकेच्या वाहनतळाबाबत अभ्यास करता अहमदनगर महानगरपालिकेकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर.

१.वाहनतळ मक्ता पध्दतीने देणेकामी शर्तीची यादी.

१. ज्यांच्या नांवे टेंडर मंजुर होईल त्याने टेंडर मक्त्याची रक्कम ७ दिवसात पुर्ण भरल्याशिवाय त्यास मक्त्यांचे हक्क प्राप्त होणार नाही. जर टेंडर मक्तेदराचे अडचणीमुळे रद्य झाल्यास फेर टेंडर मागविणेत येईल आणि यामध्ये मनपाचे नुकसान झाल्यास ते वसुल करण्यात येईल.

२. वाहनतळ रात्रंदिवस २४ तास उघडा ठेवला पाहिजे. वाहनतळावर मक्तेदाराने स्वतः अगर स्वतःचे खर्चाने कर्मचारी ठेवुन वसुल करावयाचा आहे.अशा कर्मचा-यांची नांवे व पुर्ण पत्ता महानगरपालिकेस आगावु देणेचा आहे. वाहनतळावर काम करणा-या कर्मचा-यांना त्यांचे फोटोसह आयडेंटीटी कार्ड देणेचे आहे. त्यांना गणवेष देणेचा आहे.

३. वाहन तळावरील वाहनांची मोडतोड,चोरी,नादुरूस्ती व फसवणुक करणे यासर्वस्वी मक्तेदारच जबाबदार राहील. महानगरपालिकेच्या वाहनतळावर सुरक्षिततेची संपुर्ण जबाबदारी मक्तेदार यांचेवर राहील. वाहनतळाचे वाहनतळाचे नुकसान झाल्यास मक्तेदाराकडुन वसुल करण्यात येईल.

४. वाहनतळाचा उपयोग वाहनतळासाठीच केला पाहिजे. अन्य व्यवहार झाल्यास निदर्शनास आल्यास मक्ता करारभंग झाल्याचे समजुन मक्ता संपुष्टात आणणेत येईल.वाहनतळावर कोणत्याही प्रकारचे कायम अगर तात्पुरते अतिक्रमण मक्तेदारांनी करू देणेची नाही व स्वतः करणेचे नाही.

५. मक्तेदार अगर त्यांच्या कर्मचा-यांनी वाहनतळावर सभ्यतेचे वर्तन केले पाहिजे.

६. मक्तेदारास पोटमक्ता देता येणार नाही.

७.कोणत्याही कारणास्तव मक्त्याच्या मुदतीत केंव्हाही मक्ता रद्य करणेचा व मक्तेदारास वाहन फी वसुल न करणेचा सांगणेचा हक्क महापालिका आयुक्त यांना आहे. त्याबाबत मक्तेदारास तक्रार करता येणार नाही. किंवा नुकसान भरपाई मागता येणार नाही.

८. सरकारी हुकूम , नैसर्गिक आपत्ती अन्य अपरिहार्य कारणाने वाहनतळ बंद राहील्यास त्याबाबत मक्तेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. अगर त्याबाबत त्यास तक्त्याच्या रकमेतुन सुट मिळणार नाही. व उर्वरित रक्कम मागता येणार नाही.

९. महानगरपालिकेचे निश्चित केलेले दराचे फलक जागेच्या दर्शनी ठिकाणी स्वखर्चाने लावणेंचे आहे.

१०. वाहन ज्या स्थितीत तळावर लावलेले आहे, त्याच स्थितीत मक्तेदाराने वाहन परत करणेचे आहे.

११. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे वाहन भाडे वसुल करावयाचे आहे.

| दर | | |
|---|---|---|
| १ | सायकल | रू.०.५० पैसे प्रति तासास |
| २ | स्कुटर व मोटार सायकल | रू.१.५० पैसे प्रति तासास |
| ३ | ४ चाकी कार व जीप वगैरे | रू.२.०० पैसे प्रति तासास |
| ४ | प्रवासी बस,ट्रक आणि अवजड वाहने | रू.२०.०० पैसे प्रति तासास |

१२. वाहन तळावर वाहन जमा असल्याबाबत मक्तेदारांनी छापील पावती देणेची आहे.
१३. मक्तेदार यांनी वाहनतळ नियमांचे उल्लंघन करणेचे आहे.

१४. मक्तेदार यांनी मक्त्याच्या कालावधीचा स्वखर्चाने करारनामा करून देणेचा आहे. यासाठी प्रॉपर्टी कार्डधारक (लायक ) जामीनदार देणेचा आहे.

सदरहु अटी व शर्ती वाचुन पाहिल्या त्या मला मान्य आहेत.त्याचप्रमाणे मी महानगरपालिकेचे मालकीचे वाहनतळ ताब्यात असेपर्यंत चांगले ठेवीन.

( मक्तेदाराची सही )

वरीलप्रमाणे पे ॲण्ड पार्क संबंधी अटी व शर्ती तसेच प्रसिध्दीकरणाबाबत कोल्हापुर महानगरपालिकेने फॅक्सद्वारे माहिती पाठविली आहे.

सध्या अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिकेसमोर बेग पटांगण येथे व चित्रा टॉकीज समोर पे ॲण्ड पार्क साठी जागा उपलब्ध आहे. तसेच जा.नं.टी.पी.२८८९ दि.२९-१०-२००४ अन्वये बेग पटांगण ही जागा शासनास मंजुरीसाठी सादर केलेल्या विकास योजना दुसरी सुधारित मध्ये आ.क्र.१४८, शॉपिंग सेंटर व ऑफिसेस तसेच आ.क्र.१४७ लायब्ररीसाठी आरक्षित असुन सदरची विकास योजना शासनाकडुन अद्यापी मंजुरी झालेली नाही. विषयांकित जागेत विकास योजना दुसरी सुधारित मंजुर होईपर्यंत फक्त तात्पुरत्या स्वरूपात सायकल स्टॅण्डसाठी परवानगी देणेस हरकत नाही,असे कळविले आहे.तसेच मनपा हद्दीमध्ये वेळोवेळी उपलब्ध होईल अशा जागेवर पे ॲण्ड पार्कसाठी जागा उपरोक्त अटी व शर्तीनुसार देणेबाबत आदेशार्थ सादर.

**प्रस्ताव क्रं.६ आरोग्य विभाग.**

फेरसादर,

विषय :- मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी आरोग्य विषयक असलेल्या तरतुदीचा भंग केल्यास प्रशासकीय सेवाशुल्क आकारणी करणे बाबत व मुंबई पोलिस कायदा अंतर्गत अतिरिक्त पोलिस अधिकार प्रदान करणे बाबत..

संदर्भ :- मा.अहमदनगर महानगरपालिका ठराव क्रमांक ७ दिनांक २०/११/२००४.

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार सार्वजनिक स्वच्छता विषयक तरतुदीनुसार कार्यवाही बाबत तसेच कचरा, घाण, मुलद्रव्ये इ.सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर टाकण्यास प्रतिबंध करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार तत्कालीन मा.नगरपरिषद खास सभा ठराव नं.८ दिनांक २६/२/२००३ अन्वये घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नगरपालिका हद्दीतील नागरिकांनी वरीलप्रमाणे बाबी नमुद केल्याप्रमाणे आरोग्य विषयक असलेल्या तरतुदीचा भंग केल्यास सेवाशुल्क रुपाने दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार नगरपरिषदेने प्राधिकृत (Authorization) केलेल्या कोणत्याही अधिका-यास (जो स्वच्छता निरीक्षक दर्जाचे कमी नसेल) प्रदान करण्यात आलेले आहे.

त्यानुसार तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम सन १९८६ व त्या खालील नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे तरतुदी अंतर्गत व तत्कालीन नगरपरिषद ठरावा अंतर्गत जो कोणी रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी कचरा घाण टाकील साठविल किंवा दुस-या मार्फत टाकल्यास परवानगी देईल किंवा इमारतीचे निरुपयोगी राडारोडा, वीट, माती इ. रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी टाकील अशा सर्व व्यक्ती संस्था यांचे विरुध्द नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे तरतुदीचे उल्लंघन केल्या बाबत द्रव्यदंड करण्यांत येईल किंवा जो कोणी व्यक्ती त्याचे जागेतून घाण, सांडपाणी द्रव्ये महानगरपालिकेच्या जागेवर रस्त्यावर वाहून सोडून देईल. तयांना वरील नियमांतर्गत व तत्कालीन नगरपरिषद ठरावा अंतर्गत रु.५०/- पेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाची प्रशासकीय सेवा शुल्क रुपाने वसुल करण्याचे अधिकार प्रदान करण्यांत आले होते.

तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण १४ मधील ५ (१) व (२) मधील तरतुदीनुसार बाधा आणणा-या व्यक्तीकडून त्यांनी केलेल्या कृत्यासंबंधी वाहतुक खर्च व प्रशासकीय सेवाशुल्क आकारणी करणेबाबत उल्हासनगर मनपा, जळगांव मनपा, सांगली मिरज आणि

कुपवाड शहर महानगरपालिका यांनी केलेल्या कार्यवाहीच्या माहितीच्या आधारे तसेच मुंबई पोलिस कायदा १९५१ चे कलम १०७,१०८,११५ व ११६ तसेच कलम १४ व २२ चे तरतुदी प्रमाणे महानगरपालिका अंतर्गत असणारे संबंधित प्रभागाचे स्वच्छता निरीक्षक तसेच मुख्य स्वच्छता निरीक्षक यांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी आरोग्य विषयक बाबत असलेल्या तरतुदीचा भंग केल्यास सेवाशुल्क आकारणी करणे बाबत जागेवरच कारवाई करण्यासाठी 'अतिरिक्त पोलिस अधिकारी ' म्हणुन अधिकार

मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचेकडून प्राप्त होणेसाठी मनपाने प्राधिकृत (Authorization) केलेल्या कोणत्याही अधिका-यास (जो स्वच्छता निरीक्षक दर्जाचे कमी नसेल) अधिकार प्रदान करणे बाबत सविस्तर प्रस्ताव व खालील तक्त्याप्रमाणे दर सुचविले आहे.

दरतक्ता

| अ.नं. | उपद्रवाचे स्वरुप / प्रकार | प्रस्तावित शुल्क रुपये |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी शौचास बसणे/ बसविणे, लघवी करणे | ५०/- |
| २ | सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर, कचराकुंडी बाहेर / कचराकुंडीचे जागेचे ठिकाणाव्यतिरिक्त केरकचरा टाकणे | ५०/- |
| ३ | सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर किंवा सार्वजनिक खुल्या जागेत, सार्वजनिक कार्यालये, प्रार्थनास्थळे या ठिकाणी थुंकणे, घाण करणे. | ५०/- |
| ४ | सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर किवा कचराकुंडया बाहेर टाकाउ खाद्य पदार्थ टाकणे. | २००/- |
| ५ | फेरीवाले व्यावसायिक / दुकानदार / नारळ विक्रेते यांनी व्यवसायाचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणे | १००/- |
| ६ | फेरीने भाजी / फळफळावह विक्री करणारे व्यवसायिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे. | १००/- |
| ७ | सर्व प्रकारच्या व्यावसायिकांनी आपले व्यावसायातील टाकाउ पदार्थ खुल्या जागेत सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर, गटार-नाल्यामध्ये, कुंडयाव्यतिरिक्त कोठेही टाकणे. | २००/- |
| ८ | सार्वजनिक जागेत / खुल्या जागेत /रस्त्यावर जनावरे बांधणे / जनावरांचे शेण / चिपाडे टाकणे, साठविणे गोव-या घालणे. | २००/- |
| ९ | औद्योगिक व्यवसाय करणा-यांनी आपले व्यावसायातील निकामी टाकाउ वस्तु सार्वजनिक रस्त्यावर खुल्या ठिकाणी टाकणे. | ५००/- |
| १० | दवाखाने / हॉस्पीटल / सुश्रुषागृहे / इत्यादीतील टाकाऊ वस्तु उदा - सुया, रबरी नळया, सलाईन बाटल्या, कॉटन वेस्ट वगैरे सार्वजनिक रस्त्यावर खुल्या जागेत टाकणे. | ५००/- |
| ११ | सार्वजनिक जागेत रस्त्यावर कचराकुंडीचे बाजूस दगड/ माती/ रेती/ वीटा रोडा इ. टाकणे. | ५००/- |

वरील प्रस्तुत प्रस्तावा प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचे शहरात स्वच्छता पर्यावरण आणि नांगरिकांना उपद्रव होऊ नये म्हणून प्रस्तावित कारवाईस मान्यता देणेस हरकत नाही. सदरचे प्रशासकीय सेवा शुल्क वसुलीचे अधिकार सक्षम प्राधिका-यांचे मान्यतेने प्रदान करणे संयुक्तीक वाटते अशा अभिप्रायासह सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे (दिनांक २०/११/२००४) ठेविला असता सदर विषयांवर सविस्तर चर्चा होऊ न सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत झाला आहे की, उपरोक्त विषयाबाबत सांगोपांग चर्चा झालेनंतर सर्वानुमते विषय तहकुब करण्यात आला.

मात्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधील (र) प्रमाणे पारीत असणारा विषय हा तीन महिने कालावधी पर्यंत सर्वसाधारण सभेपुढे घेता येणार नाही. परंतु सदरचा विषय सर्वानुमते तहकुब करण्यांत आलेला आहे. वरील विषय हा प्रशासकीय सेवाशुल्क आकारणी बाबत तरतुद करणे संबंधी असल्याने व अंदाजपत्रकाशी निगडीत असल्याने तसेच दिनांक १७/१२/२००४ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये घनकचरा व्यवस्थापन कक्ष अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी घेतलेल्या कार्यशाळेमध्ये सदर विषयाबाबत तरतुद करणेसाठी सुचना केलेली असल्याने प्रस्तुत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीने महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे येणे उचित वाटते.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधील (र) प्रमाणे वरील प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवुन अंदाजपत्रकामध्ये तरतुद करणे बाबत व मुंबई पोलिस कायदा १९५१ चे कलम १०७,१०८,११५ व ११६ तसेच कलम १४ व २२ चे तरतुदीप्रमाणे अतिरिक्त पोलिस अधिकारी म्हणून महानगरपालिकेने प्राधिकृत (Authorization) केलेल्या कोणत्याही अधिका-यास (जो स्वच्छता निरीक्षक दर्जाचे कमी नसेल) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचेकडे अधिकार प्रदान करणे बाबत शिफारस करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव व आदेशार्थ सविनय सादर.

**प्रस्ताव क्रमांक - ७ पाणी पुरवठा विभाग**

विषय : पिण्याच्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजना यांना विजबिलांच्या थकबाकीत
द्यावयाच्या सवलती संदर्भातील योजना संजीवनी.
शासन निर्णय क्र.बीएलए-२००४/प्र.क्र./१६११/उर्जा मंत्रालय, मुंबई दि.१२/७/०४.

मा.सादर,

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, मा.शासनाचे निर्णयानुसार सार्वजनिक नळ पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे त्यांचे दिनांक २१/७/२००४ रोजीचे परिपत्रकान्वये जाहिर केलेल्या सार्वजनिक पिण्याच्या नळपाणी पुरवठा योजनांच्या वीज बिलांच्या थकबाकी बाबत सवलत देण्याची सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजीवनी योजना जाहीर केलेली आहे. मात्र म.रा.वि.मंडळाने जाहीर केलेली योजना नगरपालिकेसाठी असुन त्यात महानगरपालिकेचा समावेश नाही.

याच संदर्भात दिनांक २६/८/२००४ रोजी मा.आयुक्त महानगरपालिका यांचे दालनात संयुक्त बैठक झाली या बैठकीस म.रा.वि.मंडळाचे अधिक्षक अभियंता मा.श्री.एम्पाल साहेब लेखाधिकारी, विभागीय लेखापाल, म.न.पा.चे प्रभारी आयुक्त इत्यादी उपस्थित होते. या बैठकीमध्ये अधि.अभि.यांचेकडून वरील योजनेची प्रत देण्यात आली व त्याचप्रमाणे महानगरपालिकेकडे प्रलंबित असलेल्या थकीत रक्कमा व महानगरपालिकेकडे पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत होण्यापुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे थकीत असलेल्या रकमेचा तपशील सांगण्यात आला. संपुर्ण कृषी संजीवनी योजनेचा तपशील देण्यात येवुन माहे जुन ०४ अखेर महानगरपालिकेकडे असलेली थकबाकी रकमेपेक्षा रु.४५.८६ कोटी पेक्षा रक्कम रुपये १४.४४ कोटी रकमेचे दरमहा मासिक समान हप्त्याने याप्रमाणे म.न.पा ने ोरणा केल्यास उर्वरित रक्कम माफ होवु शकते व याप्रमाणे म.न.पा.ने अशा प्रकारची तयारी दाखविल्यास याबाबत मंडळाशी संपर्क करुन सदर योजनेचा लाभ मिळविणेसाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. असेही अधि.अभियंता म.रा.वि.मंडळ यांनी बैठकीत सांगितले या योजनेचा लाभ घेतल्यास म.न.पा.चा ३१ कोटीचा फायदा होणार आहे असे सुचित केले.

अधिक्षक अभियंता, म.रा.वि.मंडळ यांचे पत्र क्रमांक अ.अ./नगर/सवंसुम/लेखा/००७९३० दि.२७/७/२००४ चे पत्रान्वये माहे जुन-२००४ अखेर खालील प्रमाणे थकबाकी नमुद केलेली आहे.

| अ.नं. | नांव | मुळ थकबाकी (लाखात) | विलंब आकार (लाखात) | थकबाकी वरील व्याज (लाखात) | एकुण थकबाकी (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका (३ कनेक्शन) | २८८६.७८ | ५७.७४ | १६४१.०४ | ४५८५.५६ |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (४ कनेक्शन) | ३३६४.६० | ६७.२९ | ४५२१.२५ | ७९५३.१४ |
| | एकुण | ६२५१.३८ | १२५.३८ | ६१६२.२९ | १२५३८.७० |

परंतु महानगरपालिकेकडील उपलब्ध रेकॉर्ड पहाता (सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे) मुळ थकबाकी ही रक्कम रुपये २७,५७,०१,९५५=०० आहे. मा.शासनाचे निर्णयानुसार " सार्वजनिक नळपाणी पुरवठा संजीवनी " योजने अंतर्गत ३० जुन २००४ पर्यंतच्या मुळ थकबाकी पैकी ५०% रक्कम माहे जुलै - ०४ पासुन दहा समान मासिक हप्त्यात भरणा केल्यास तसेच चालु विद्युत देयकाची रक्कम नियमीत भरल्यासच त्यांना सदर योजने अंतर्गत देण्यात येणा-या सवलतीचा लाभ मिळेल व ५०% रक्कम हप्त्या हप्त्याने भरल्यानंतर थकबाकीचीही उर्वरीत रक्कम माफ करणेत येईल. इत्यादी शासन निर्णयात नमुद केलेले आहे. त्यामुळे म.न.पा.कडील मुळ थकबाकीची ५०% रक्कम रुपये १३,७८,५०,९७८=०० इतकी होत असुन सदर रकमेचे दहा समान हप्ते केल्यास रु.१,३७,८५,०९८/- याप्रमाणे रक्कम म.रा.वि.मंडळाकडे भरावी लागेल. म.रा.वि.मंडळाने त्यांचे संदर्भीय पत्रात आहे जुन - २००४ अखेर महानगरपालिकेकडे मुळ थकबाकी व त्यावरील विलंब व्याजासहितचा एकुण थकबाकी रु.४५८५.५६ लाख इतकी दर्शविलेली आहे. त्यामुळे सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने " सार्वजनिक नळपाणी पुरवठा संजीवनी " या योजनेचा लाभ म.न.पा.ने घेणेबाबत प्राधान्याने विचार केल्यास उर्वरित ५०% रक्कम व त्यावरील विलंब व व्याजासहितची रक्कम माफ होवुन म.न.पा.ला रु.३२०७.०५ लाखाचा फायदा होईल. असे एकंदर दिसुन येते.

तरी मा.शासन निर्णय क्र.बी.एलए - १००४/प्र.क्र.१६९९/उर्जा-४ दिनांक १२/७/०४ नुसार सार्वजनिक नळ पाणीपुरवठा संजीवनी " योजने अंतर्गत म.न.पा.चे उपलब्ध रेकॉर्ड नुसार मुळ थकबाकीची ५०% रक्कम रु.१३,७८,५०,९७८/- चे दहा समान हप्ते करुन म.रा.वि.मंडळाकडे भरणे बाबत आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

**प्रस्ताव क्रमांक : ८ :- पाणी पुरवठा विभाग.**

फेरसादर,

विनंती रिपोर्ट फेरसादर की, अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करणेसाठी म.न.पा.ने दि.३१/३/०४ अखेर पर्यंतची मुदत दिली होती. सन २००४-२००५ चे वर्षात अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करणेस्तव ४७००+१५०० (चालु वर्षाची पाणीपट्टी) अशी एकुण ६२०० ची बिले संबंधितांना दिलेली आहेत. सध्या या योजनेनुसार अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करुन घेण्याची कार्यवाही चालु आहे.

परंतु यापुढे माजी सैनिक संघाने केलेल्या सर्वेक्षणाखेरीज एखादे नळ कनेक्शन अनधिकृत नळ कनेक्शन म्हणून आढळून आलेस, अशा नळ कनेक्शन धारकांकडून त्यांचे असलेल्या नळ कनेक्शनच्या आकारानुसार / वापरानुसार सन २००३-०४ ची पाणीपट्टी + सन २००४-०५ ची पाणीपट्टी + पाणीपट्टी इतकी अनामत रक्कम + सेवाशुल्क + दंडनीय आकार ' या प्रमाणे आकारणी करावी असे वाटते. वरील सुत्रात सध्याच्या दंडनीय आकारात बदल करुन तो रु.१०००/- ऐवजी रु.२०००/- करावा असे वाटते. तसेच सन २००५-०६ ची नियमीत बिलेही देणे क्रमप्राप्त वाटते.

म्हणजेच वरील सुत्रानुसार १/२ " घरगुती नळ कनेक्शन अधिकृत करणे कामी पुढील प्रमाणे खर्च संभावतो.

१५०० + १५०० + १५०० + ५०० + २०० + २००० = ७२००/-

तरी यापुढे एखादे नळ कनेक्शन बेकायदेशीर / अनधिकृत आढळुन आल्यास संबंधितांकडून वरील सुत्रानुसार नळ कनेकशनच्या आकारानुसार व वापरानुसार एकुण बील आकारणी करुन नळ कनेक्शन अधिकृत करुन घेणे योग्य वाटते.

तथापी योग्य त्या आदेशार्थ सादर.

-- * --

चर्चा :

दिनांक १९-२-२००५ रोजी अहमदनगर महानगरपालिकेची सन २००४-२००५ ची सुधारित व सन २००५-२००६ चे मुळ अंदाजपत्रकांवर चर्चा करण्यांसाठी सभेचे कामकाज सुरु झाले.सुरुवातीस श्री.मनेष साठे,सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रकांवरील त्यांचे मनोगत वाचुन दाखविले.त्यानंतर मा.महापौर यांनी अंदाजपत्रकावर मा.सदस्यांनी चर्चा करावी असे सुचविले. त्याचप्रमाणे २० फेब्रुवारीच्या आत महानगरपालिकेला कर आणि दर निश्चीत करणें आवश्यक असल्यांने जकात , घरपटटी,आणि पाणीपटटी यावर चर्चा करावी असे सुचविले.

मा.श्री.कानडे : हेडवाईज चर्चा करण्यांस हरकत नाही.

मा.श्री.अनंत जोशी : मा.सभापती स्थायी समिती यांनी महापालिकेसमोर अंदाजपत्रक मांडलेले आहे.त्याबद्यल त्यांचे अभिनंदन करतो. तथापि उपनगर सावेडी विभागावर अन्याय झालेला असल्यामुळे सावेडी भुयारी गटार योजने बाबत माहिती द्यावी याबाबत वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. सावेडी भुयारी गटार योजनेसाठी भरीव तरतुद करण्यांत यावी.वर्षाअखेरीस जी शिल्लक दाखविलेली आहे,त्यातुन हि तरतुद करण्यांत यावी.तसेच वेळप्रसंगी कर्ज घेण्यांत यावे.व योजनेसाठी ३ कोटी ९० लाखाची तरतुद करावी अशी मागणी केली.

मा.श्री.मिलिंद गंधे : भुयारी गटार योजना सावेडी उपनगरासाठी आवश्यक बाब आहे. यासाठी बजेट तरतुद झाली पाहिजे.प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.सुरेश शेळके : घरपटटीचा विषय गहन बनलेला आहे.तो सोडविण्यांत यावा.सन १९८९ पासुन घरपटटी मध्ये १० पटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे. सन १९८५ ते १९९७ मध्ये २४ % कर संकलीत कर होता. सन १९९७ नंतर २७ % आकारणी करण्यांत आली.तेंव्हा घरपटटी अवास्तव वाढलेली असल्याने ही घरपटटी २७ % ऐवजी २१ % करण्यांत यावी.यातुन महानगरपालिकेला जी तुट येईल ती तुट महानगरपालिकेच्या ज्या शाळातील वर्ग खोल्या इतर संस्थांना भाडयाने देण्यांत आलेल्या आहेत ते भाडे ठरून आलेले असल्यामुळे त्याची वसुली दाखवुन भरुन काढण्यांत यावे.तसेच पाणीपटटीची वाढ झालेली आहे ती पाणीपटटी यापुर्वी आचारसंहितेमुळे मनपा कमी करु शकलेली नव्हती.ती पाणीपटटी रु. १५०० चे ऐवजी १२०० करण्यांत यावी.ही तुट स्कुल बोर्ड जागा भाडेमध्ये भरुन काढण्यांत यावी.

मा.श्री.सतिष मैड : यांनी आडतेबाजार येथील जड वाहतुकीला रस्ता बंद केल्याबाबत प्रश्न उपस्थित केला.व त्याबाबत खुलासा द्यावा अशी मागणी केली.त्याबाबत मा.आयुक्त यांनी त्यांना खुलासा दिला.व मा.महापौर यांनी स्वतंत्र बैठकीत विषय घेऊ असे सांगितले.श्री. संजय चोपडा म्हणाले की,हा विषय ज.बो.मध्ये घेण्यांबाबत यादी दिलेली आहे.

मा.श्री.दिपक सुळ : महानगरपालिकेला २० फेब्रुवारी पुर्वी कर आणि दर निश्चीत करणें आवश्यक आहे.घरपटटी जकात अनुदान ,पाणीपटटी मागील वर्षी हे विषय फेटाळले होते.जकात कर लावणें बाबत मानसिकता नाही.सभागृहाला विनंती करतो की,जकात लावण्यांत येऊ नये व हि तुट इतर मार्गाने भरुन काढावी. घरपटटी २७ % ऐवजी २१ % घेण्यांबाबत श्री.शेळके यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मी अनुमोदन देत आहे.घरपटटी बाबत डीमांड रजिष्टरे पुर्ण करण्यांत यावी.

मा.सौ.दहिफळे : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यांसाठी शहरांमध्ये जे मोबाईल टॉवर्स उभे केले आहेत त्यावर वन टाईम टॅक्स आकारणी करावी.

मा.श्री.नामदेव पवार : गेल्यावर्षी व चालु वर्षी अंदाजपत्रकीय तफावत पाहता गेल्यावर्षी जकात कर न लावताही बजेट मध्ये तुट आहे.व चालू वर्षी प्रशासन जकात कर लावण्यांचा प्रयत्न करीत आहे. व २४ कोटी रुपयाची वाढ केली आहे.नगर शहराचे जिव्हाळयाचे प्रश्न घरपटटी,पाणीपटटी व जकात आहे.घरपटटीच्या आकारणीमध्ये नागरिकांना जवळ जवळ ३० ते १०० पट वाढ झालेली आहे. त्यामुळे घरपटटीची फेर रचना करावी. व सन १९८९ - ९० हे साल पायाभुत धरुन जास्तीत जास्त २ ते ३ पट वाढु शकेल.पाणीपटटी पुर्वी २४० होती त्यानंतर ती ४८० झाली व त्यानंतर पुन्हा ८०६ व ८०६ वरुन १००६ इतकी पाणीपटटी करण्यांत आली.तेंव्हा पाणीपटटी रु.१२०० करण्यांत यावी व त्यामधुन येणांरी तुट ही श्री.शेळके व श्री.सुळ यांनी सुचविल्याप्रमाणे शाळाभाडे मधुन भरुन काढण्यांत यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव : घरपटटी मध्ये १९८९ - ९० पासुन वाद सुरु झालेला आहे.सन १९९४ - १९९५ मध्ये रिव्हीजन करतांना चुकीची मोजमापे घेतलेली असुन त्यामध्ये जीना,संडास ,व्हरांडा इत्यादी धरण्यांत आले आहे त्यावर आकारणी करु नये.त्याचप्रमाणे घरपटटी २१ % करावी.मंदिर मस्जिद व धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी असलेले कर माफ करण्यांत यावे.सन १९८९ - ९० चे समितीपुढे जी प्रकरणे निकाली निघाली त्याबाबत दि.१३-१२-२००१ चे ठरावात दुरुस्ती करावी व आपणांस असलेले अधिकाराचा वापर करावा.पाणीपटटी जादा आहे रुपये १००० करावी सर्व वसुल होईल.कनेक्शन देण्यांचे नियम शिथील करावेत.वसुल जास्तीत जास्त होऊ शकेल व मनपाच्या उत्पन्नात भरच पडेल.जकाती बाबत बोलतांना श्री.कृ.द.जाधव म्हणाले की,जकात कर लावण्यांस आमचा विरोध आहे.पण बाजारपेठ नाही.तालुक्याच्या ठिकाणी सुध्दा आता बाजारपेठ झालेली आहे.जकातीचा बोजा नागरिकांवरच पडेल.जकात लावण्यांबाबत शासनाचे नगरपालिकेवर बंधन नाही.जकातीमध्ये २४ कोटी अपेक्षित धरलेले आहे.तथापि जकात न लावता ६ कोटी ३० लाख फक्त कमी होणांर आहे.अंदाजपत्रकाचे आकडे फुगविलेले आहे. वास्तविक बजेट ५५ कोटीचेच आहे.न.पा.शिक्षण मंडळाकडील इमारतीच्या जागांवर भाडे आकारणी करुन तुट भरुन काढण्यांसारखी आहे. भाडे आकारणी साठी चार वर्ष लागले वसुलीसाठी ८ वर्ष लागणांर काय ?

मा.श्री.कानडे : श्री.मनेश साठे सभापती स्थायी समिती यांचे विचार महत्वपुर्ण आहे.सामान्य माणसाशी वचनबध्द आहे.मात्र मुलभूत प्रश्नावर अंदाजपत्रकामध्ये चर्चा झाली पाहिजे. हद्दवाढीच्या भागामध्ये पिण्यांचे पाणी ड्रेनेज गटार,स्मशानभुमी इत्यादी प्रश्न प्रलंबित आहे व त्यांची अवस्था

भयानक आहे.बजेट मधील तरतुदीबाबत काय ? स्मशानभुमी बाबत काय याबाबत प्रशासन व महानगरपालिकेला वेळेवेळी निवेदन दिलेले आहे.घरपटटी २७ % वरुन १० % कमी करुन १७ % करण्यांत यावी.पाणीपटटी १२०० रुपये करण्यांत यावी.जकात कर लागु करु नये व योग्य भुमिका घेण्यांत यावी.उपनगरासाठी अंदाजपत्रकामध्ये तरतुद नाही झिरो तरतुद आहे.अंदाजपत्रकामध्ये नविन रस्त्यांवर ३ कोटींची तरतुद करण्यांत आली होती.चालु वर्षी मात्र या हेडवर झिरो तरतुद दाखविली आहे.तरी त्यावर १ कोटी ५० लाखाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.गिरवले : त्सुनामीग्रस्तांसाठी नगरसेवकांचे दोन महिन्याचे मानधन द्यावे.अशी सुचना मांडली.पुढे बोलतांना सांगितले की,जकात,घरपटटी व पाणीपटटी सन १९८९ नंतर घरपटटीत वाढ झालेली आहे.सन १९९४-९५ चे रिव्हीजन चुकीचे झालेले आहे.महानगरपालिकेला कर ठरविण्यांचे अधिकार आहे.नविन रिव्हीजन करावे.लोकन्यायालयामध्ये ज्या केसेस दाखल झालेल्या आहेत त्यामध्ये न्यायालयात तडजोडी करण्यांपेक्षा मनपाने तडजोडीने प्रश्न मिटविणें शक्य आहे.वसुली बाबत वसुलीची रजिष्टरे पुर्ण झालेली नाहीत.रिव्हीजन चुकीचे झालेले आहे. २७ % आकारणी केली आहे.ती फार जास्त आहे.शिवाय यामध्ये शिक्षण कर ,वृक्षकर,रोजगारहमी कर,असे एकुण १२ % ने वाढ होऊन हा कर ३९ % वर पोहचतो. व ती मनपा वसुल करते.तरी टॅक्स रेट १० % ने कमी करुन होणां-या नुकसान थकबाकीतुन वसुल होऊ शकेल.शहरातील बरेच हॉटेल,पेट्रोल पंप,मंगलकार्यालये यांना मोठया प्रमाणांवर घरपटटी बाबत मागील आयुक्त श्री.सानप व हिरे यांनी आश्वासन दिले होते.तरी घरपटटी कमी करावी आपण पाणी व्यवस्थीत देतो का ते पहावे व पाणीपटटी रु.१२०० करावी.जकात प्रश्नाबाबत औद्योगिक वाढी बाबत शहराचा विचार केला असता औद्योगिक वाढ खुंटलेली आहे.नविन जकात कर आकारणी केली तर उद्योगधंदे उधवस्त होण्यांची शक्यता आहे.क वर्ग व ब वर्ग नगरपालिकांमध्ये जकात कर नाही.त्यामुळे मनपाच्या हद्दीमध्ये किंमतीमध्ये मोठी तफावत व वाढ होईल.जकात कर लागु न करण्यांबाबत नगरचे आमदार मा.अनिल भैय्या राठोड यांनी जनतेला आश्वासन दिले होते.त्याबद्यल त्यांचे आभारच मानले पाहिजे. यामध्ये विकास कामे रखडली तरी चालतील.विकासकामे थोडे दिवस थांबवावेत असे सुचविले.मात्र भविष्यकाळ उज्ज्वल राहणांर आहे.

मा.सौ.वर्षा अरिफ : जकात,पाणीपटटी व घरपटटी हे प्रश्न महत्वाचे आहेत.पिंपरी चिंचवड येथे वॉटरपार्क करुन उत्पन्न वाढविले आहे,त्याचा विचार करावा.

मा.श्री.सुरेश शेळके : घरपटटी ,पाणीपटटी कमी करण्यांत येणांर आहे.व जकात लावण्यांत येणांर नाही.घरपटटी मध्ये २.७६ कोटी रुपये पाणीपटटी ३०० रुपयांनी कमी केल्यांने १.३७ कोटी रु.तुट होईल व जकातीबाबत जुन पासुन अनुदानांत तुट होणांर असल्यांने साडेचार कोटी रुपये रक्कम तुटीची असणांर आहे.सध्या स्कुल बोर्डाकडील ज्या शाळा इमारती जागा भाडयाने दिलेल्या आहेत, त्यामध्ये भाडयाचे उत्पन्न साडेचार कोटी उत्पन्न बाजुला धरता येऊ शकेल. अनाधिकृत नळ कनेक्शन वसुली ७० लाख धरता येईल.जाहिरात बोर्डाचे उत्पन्न ७० ते ८० लाख धरता येऊ शकेल त्याचप्रमाणे जकात लागु केल्यामुळे खर्च बाजुला जी ५० लाख रुपयाची तरतुद करण्यांत आली आहे ती आपोआपच कमी होऊ शकेल. त्यामुळे याची तोंडमिळवणी होण्यांस मदत होईल.

मा.श्री.संजय चोपडा : अहमदनगर शहराचा विकास फक्त जकतीमूळेच खोळंबलेला आहे असे नाही.अहमदनगर शहरात बरेच उद्योगधंदे नाहीत.शहराच्या विकासाचे गाजर दाखवुन जकात लावण्यांचा प्रयत्न आहे.शहराच्या हद्यीबाहेर जकात लागु नाही.त्यामुळे जकात उत्पन्नात घटच येणांर आहे.सध्या जकाती ऐवजी टर्न ओव्हर टॅक्स लागु आहेच. त्याचप्रमाणे केंद्रशासनाचे वतीने व्हॅट ही

लागु होणांर आहे.मागील वेळी जकातीचा ठरावही फेटाळला गेला होता.मागील वेळी विकासकामी दाखविलेले बी.ओ.टी.प्रकल्प झालेले नाही.नगर शहर हे व्यापाराचे केंद्रस्थान आहे हे लक्षात घ्यावे.

मा.श्री.संदिप कोतकर : केडगांव येथे चार - चार पाच - पाच दिवस पाणी येत नाही. तेंव्हा पाणीपटटी ही १,००० रु.करावी.ज्याप्रमाणात पाणी दिले जाते त्याचप्रमाणात पाणीपटटी आकारावी.उपनगरासाठी फक्त ५०० रुपये घरपटटी करावी.घरपटटी १० ते १२ हजार लावण्यांत आलेली आहे.तेथील भौगोलिक परिस्थिती पहावी.त्यांना सुविधा नाहीत,रस्ते नाहीत.केडगांव साठी अंदाजपत्रकात भरीव तरतुद करण्यांत यावी.अंदाजपत्रकातील जकात पडणांर नाही.उत्पन्नाचे इतर स्त्रोत पहावे.

मा.श्री.त्रिपाठी : जकात प्रश्नांस विरोध आहे.माजी केंद्रिय मंत्री श्री.दिलीप गांधी,त्याचप्रमाणे मा.आमदार श्री.अनिल भैय्या राठोड यांनी जी भुमिका घेतली त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो.अहमदनगर महानगरपालिका स्थापन झाली त्यावेळी शासनाने एक पैसाही उपलब्ध करुन दिलेला नाही. मात्र हद्दवाढीतील बारा गावांवर तेरा कोटी रु.खर्च झालेले आहे. हद्दवाढीतील विभागातुन उत्पन्न मात्र खुपच कमी आहे.जकात प्रश्नांबाबत व्हिडीओकॉन,कायनेटीक यासारखे प्रकल्प स्थलांतर करीत आहे. व तालुक्यांतुन व्यापार सुरु झालेला आहे.त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेचा जकातीचा हेतु सफल होणांर नाही. त्यामुळे इतर मार्गांनी उत्पन्न वाढविणें आवश्यक आहे. जकात करास विरोध आहे.

मा.श्री.संजय चोपडा : सांगली महानगरपालिकेने कर्ज काढून मोठी कॉम्प्लेक्स निर्माण केलेली आहेत.त्याबाबत सविस्तर माहिती घ्यावी.स्कुल बोर्ड जागांबाबतचे भाडे जमेस धरावे.जळगांव महानगरपालिके प्रमाणे नविन मोबाईल टॉवरवर टॅक्स घेण्यांत यावा.नविन जाहिरात बोर्ड शोधुन त्यावर टॅक्स आकारणी करावी.त्याप्रमाणे कॅन्टोन्मेंट प्रमाणे टोल टॅक्स आकारणी करावी.

मा.सौ.डॉ.सत्रे : श्री.सुरेश शेळके यांनी केलेल्या सुचनेस अनुमोदन देत आहे. पुणे महापालिकांमध्ये संकलीत कराची आकारणी २० % आहे.नाशिक मध्ये १५ % आहे.औरंगाबाद मध्ये २० % आहे. त्याप्रमाणे आकारणी करावी.

महिला बाल विकास कामांकरीता सदर अंदाजपत्रकांमध्ये २ लाखाची तरतुद करण्यांत आली आहे. ती तरतुद अपुरी असुन रु.५ लाखापर्यंत तरतुद करण्यांत यावी.त्याचप्रमाणे मनपामध्ये मालमत्तेवर नोंदणी फी ५०० रु. ऐवजी १००० करावी.

मा.श्री.मिलिंद गंधे : पाणीपटटी १२०० रुपये घेण्यांत यावी.घरपटटी,संकलीत करामध्ये १० % सुट देण्यांत यावी.जकातीचा ऊहपोह याआधी झालेला आहेच.भा.ज.पा.ची जकात लावु नये अशी भुमिका आहे.महाराष्ट्र शासनांने अहमदनगर महानगरपालिकेस कोणतेही अनुदान दिलेले नाही.तेंव्हा महाराष्ट्र शासनांने अहमदनगर महानगरपालिकेस ५० कोट रुपयांचे अनुदान द्यावे.

मा.सौ.मंगला गुंदेचा : महानगरपालिकेने अनुदानांसाठी प्रयत्न करावे.

मा.श्री.आसाराम कावरे : नागरिकांना दिलेली आश्वासने पाळणे बंधनकारक आहे.घरपटटी पाणीपटटी कमी झाली पाहिजे.शहर सुधारणा झाली पाहिजे.यासाठी जकात कर लागु करावा.व ज्याठिकाणी ५०० चे वर कामागार आहे,त्याठिकाणी दोन वर्ष जकात आकारु नये.केंद्र शासन व राज्य शासनांकडुन रु.५० कोट प्रत्येकी अनुदान घ्यावे.लुना कंपनीला पाणीपुरवठा करण्यांत यावा.

मा.श्री.अभय आगरकर : आज श्री.मनेश साठे सभापती स्थायी समिती यांनी महानगरपालिकेला जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे,त्याबद्यल त्यांना मी धन्यवाद देतो.विकास योजनेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.अंदाजपत्रकांमध्ये काही विषय संभ्रमामध्ये टाकणांरे असतात किंवा वास्तवापासुन दुर जाणांरे असतात.समाज टिकला तर संस्था टिकु शकतात.ऑक्ट्रॉय,पाणीपटटी घरपटटी कमी करावी.याबाबत समन्वय साधला गेला पाहिजे.तसेच अंदाजपत्रकांत होणांरी तुट भरुन काढता येईल असे चित्र उभे केले गेले पाहिजे.त्याकरीता वास्तवामध्ये संघर्ष करावा लागेल.निर्णय कटु असतात अंदाजपत्रकामध्ये विविध विकास कामांसाठी तरतुद केलेली आहे.ऑक्ट्रॉय कमी करावयाचा असेल तर पवनउर्जा प्रकल्प झाला पाहिजे.पवनउर्जा प्रकल्पासाठी तरतुद करावी.यामधुन दरवर्षी ४ ते साडेचार कोटीचा फायदा होईल.व पवनउर्जा प्रकल्प झाला पाहिजे.त्यामुळे एम.एस.सी.बी.च्या बिलाचा मेळ बसु शकेल.याप्रकल्पास प्राधान्य देणें ही काळाची गरज आहे.तथापि या कामी गती मिळालेली दिसुन येत नाही.पाठपुरावा करणें आवश्यक आहे.

जनुभाऊ काणे विकास योजना ३९ लाखाचे अनुदान असतांना कार्यवाही झाली नाही.उत्पन्न देणांरे प्रकल्पांना प्राधान्य देण्यांत यावे.घरपटटी जाचक आहे.योग्य तो निर्णय घ्यावा.मात्र पाणीपटटी दर तोच ठेवला तरच योजना चालु राहिल.या योजनेतुन पाणी रोजचे रोज द्या मात्र पटटी कमी करु नका.संस्था चालली पाहिजे,वास्तवाचे भान ठेवले पाहिजे.ऑक्ट्रॉय कर लावण्यांत येवू नये,घरपटटी ६ ते ७ % कमी करावी.पाणी पटटीचे दर कायम ठेवावेत.

मा.श्री.दिप चव्हाण : आजच्या सभेला नागरिक प्रेक्षक गॅलरीमध्ये अहमदनगरचे लोकप्रिय आमदार मा.श्री.अनिल भैय्या राठोड हे या ठिकाणी उपस्थित आहेत त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो.तसेच महापौर आणि महापालिका प्रशासन यांनी जे अंदाजपत्रक सादर केले आहे, ते अ,ब,क,या मध्ये सादर केले त्याबद्यलही त्यांचे अभिनंदन करतो.मागील सन २००२-२००३ चे बजेट जिल्हाधिकारी यांनी ४८ कोटीवरुन ७० कोटीवर व सन २००४-२००५ चे ७५ कोटी वरुन २००५-२००६ चे ७९ कोटी ३४ लाखाचे बजेट सादर केले आहे.आकडेवारी फुगविलेली आहे. सन १९९९ पासुन जकात बंद झालेली आहे.व असे असतांनाही चुकीचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे काय ? मागील वर्षीही बजेट मध्ये २४ कोटीची तुट होती.फुगविलेले बजेट ५४ कोटी वरुन ७९ कोटीवर गेले आहे.मागील वर्षी जकात बंद होती.त्यामुळे बजेट हे ४९ कोटी एवढेच आहे,त्यात कोणतीही तुट नाही.

जकात बंद झाली तरी ६६ % अनुदान २ वर्षे मिळणांर आहे.शासन अनुदान बंद करु शकत नाही.त्याचप्रमाणे शासनाकडे महानगरपालिकेचे ३१ कोटी रुपये येणे आहे.त्यामध्ये विविध महागाई भत्ता अनुदान थकबाकी पाचव्या वेतन आयोगाचा अनुदान,रस्ते अनुदान,इ.मुद्रांक शुल्क बेवारस रस्ता अनुदान इ.जकात अनुदान बंद झाल्यास व शासनाने ९ कोटी दिल्यास तुट भरुन निघु शकेल.अनुदान मिळण्यांसाठी प्रयत्न करावयास हवे.शासनांकडुन मिळणांरे अनुदान दरवर्षी मिळत नाही,त्यामुळे तुट ये आहे.जकात करामुळेच प्रगती थांबते असे म्हणणे कितपत योग्य आहे.मागे जकात असतांना कितपत विकास झाला, मागील वर्षी महानगरपालिकेच्या उत्पन्नांमध्ये संकलीत कर ९ कोटी अपेक्षित असतांना २ कोटी ७२ लाख वसुल झाले.पाणीपटटी ८ कोटी ३० लाख असतांना २ कोटी मिळाले.गाळा व इतर भाडे १ कोटी २० लाखअसतांना फक्त ५८ लाख मिळाले.

मागील अपेक्षित उत्पन्न उदा.घरपटटी वसुल होत नसेल तर त्याबाबत कोणांवर काय कारवाई होऊ शकते ते स्पष्ट करावे.बी.पी.एम.सी.ॲक्ट मध्ये महानगरपालिका कायद्यामध्ये जकात कर हा ऐच्छिक कर आहे.संकलीत कर कमी झाला पाहिजे.रेटेबल व्हॅल्यु कमी करणें बाबत ज्या ७२ हजार मिळकती आहेत त्यामध्ये रेटेबल व्हॅल्यु ४६ कोटीवर संकलीत कर १२ कोटी ४२ लाख आहे.६ वर्षाची थकबाकी १०० कोटीवर जाते.त्यामुळे घरपटटीचे दर ( रेट ) कमी केल्यास १०० % वसुली

होऊ शकते.त्यामुळे १२ कोटी ४२ लाख अपेक्षित पैकी ३० % कमी म्हणजे १०.१० कोटी वसुल होऊ शकेल.त्यामध्ये १.४२ कोटी फक्त तुट होऊ शकेल.

सर्व विकास कामे बाजुला ठेवावी.रेटेबल व्हॅल्यु ३० % कमी करावी.पाणीपटटी १५०० वरुन ३०० ने कमी करुन १२०० रुपये करावी.पाणीपटटी बाबत मागील वेळी केलेला ठराव शासनाने रद्य केलेला आहे.

अंदाजपत्रकामध्ये ४ कोटी शिल्लक दाखविलेले आहे.त्यामध्ये कायनेटीक कंपनीचे पैसे कोर्टामध्ये शिल्लक दाखविलेले आहे ते खर्च करता येणांर नाही.

मा.श्री.सतिष मैड : जड वाहतुकीबाबतचा प्रश्न निर्माण केला.

त्यांनतर खालील सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

श्री.गारुडकर,सौ.मुदगल,श्री.कृ.द.जाधव,

मा.श्री.गिरवले : घरपटटी बाबत १९९५,१९९७ चा वाद न्यायालयात गेला आहे.त्याबाबत तोडगा काढावा व घरपटटी कमी करावी.क्रिडा संकुलाबाबत काही तोडगा निघालेला नाही.संपुर्ण प्रोजेक्ट ताब्यात घ्यावा.

मा.श्री.शेख मुद्यस्सर : घरपटटी कमी होत नसेल तर फकीरवाडयाला परत ग्रामपंचायत करावी.

मा.श्री.आगरकर अभय : अहमदनगर शहरातील पांजरापोळ ही संस्था अनाथ अश्रित जनावरांचे पालन पोषण व संगोपनाचे कार्य करीत असल्याने सदर संस्थेस महानगरपालिकेच्यावतीने लावण्यांत येणारे टॅक्स लावु नयेत असे सांगितले.

शेवटी मा.महापौर यांनी आभारप्रदर्शन करतांना सांगितले की,ब-याच मा.सदस्यांनी अंदाजपत्रका बाबत ऊहापोह केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिप्रेत असलेल्या चांगल्या प्रथांचा पायंडा पाडलेला आहे. व सर्वांनी चांगले मुद्ये मांडलेले आहे.करीता जकात कर प्रस्ताव रद्य करण्यांत येत आहे.त्याचप्रमाणे सविस्तर बजेट सादर करुन मंजुर करावे असे श्री.दिपक सुळ यांनी सांगितले.त्यानंतर मा.महापौर यांनी घरपटटी २७ % ऐवजी २१ % करण्यांत येत आहे.तसेंच सध्या असलेली पाणीपट्टी रु.१५०० ऐवजी रु.१२०० करण्यां येत असुन,सदरचे दर दि.१ एप्रिल २००५ पासुन लागु होतील असे सांगितले.मात्र आगरकर यांनी सांगितले की,सावेडी विभागात भुयारी गटारी योजनेसाठी तरतुद करण्यांत यावी. मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की,ज्या ठिकाणी व्यापारी वापर असेल ते क्षेत्र वगळुन मंदिर मस्जिद चर्च यांना घरपटटी माफ करण्यांत यावी चर्चा समाप्त.

-- * --

**ठराव :** अ) दिनांक १ जुलै २००५ रोजी जकात कर अनुदानात कपात होणार आहे. अनुदानातील ३३ % कपात विचारात घेवुन जकात कर लावणे अन्यायकारक ठरेल असे मा.सभागृहाचे मत आहे. त्यामुळे अगामी वर्षाकरीता जकात कर लागु करणे ही बाब अमान्य करण्यात येत आहे.

ब) शहराची हद्यवाढ होवुन महानगरपालिकेत रूपांतर झालेले आहे. त्यामुळे आजुबाजूचे ग्रामीण जीवनमान असलेले क्षेत्र महानगरपालिकेस जोडले गेले आहे. औद्योगिक व व्यापार धंद्यातील उदासिनता , बेरोजगारी अशा निरनिराळया समस्यांमुळे व महानगरपालिकेची जाचक घरपट्टी यामुळे दिवसेंदिवस नागरिकांमध्ये संस्थेविषयी नाराजीची भावना निर्माण झालेली आहे. याकरीता करयोग्य मुल्य भाडे ठरवितांना तत्कालीन नगरपालिकेने जास्तीचे दर विचारात घेवुन कररचना केलेली आहे. त्यामुळे मालमत्ता करासोबत इतरही कराच्या मोठया रकमेची बीले नागरिकांना दिली जात असुन मोठया प्रमाणात शिक्षणकर व रोजगार हमी कराची मोठी रक्कम मा.शासनास भरावी लागते. तसेच पुर्वीचे ठरविलेले करयोग्य

मुल्य इतर महानगरपालिकेच्या तुलनेत देखील जास्तीत जास्त असल्याचे आढळुन आले आहे. यास्तव सन २००५-२००६ या आर्थिक वर्षासाठी दिनांक १-४-२००५ पासुन पुर्वी ठरविलेले कर योग्य मुल्य ३० % कमी करून सुधारित करयोग्य मुल्यानुसार सर्व कराच्या आकारणी करणे आधी याबाबतची कार्यवाही मा.आयुक्त ,अहमदनगर महानगरपालिका यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार करण्यात यावी.

क) शहरात पाणीपट्टीचा १/२ " घरगुती नळ कनेक्शना करीता रूपये १५०० /- इतका आहे. सर्वसामान्यांना ही रक्कम न परवडणारी असल्याने हे दर रूपये १२००/- सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाकरीता निश्चित करण्यात येत असुन अन्य पाणी पुरवठयाच्या पाणीपट्टीच्या दरात बदल करता येत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये धार्मिक प्रयोजनासाठी वापरात असलेल्या मालमत्तेस सुट देण्यास देखील ही सभा मान्यता देत आहे.

ड) मा.स्थायी समिती मालमत्ता हस्तांतरासाठी शिफारस केलेल्या फीच्या दरास मान्यता देण्यात येत असुन ० ते १ लाखापर्यंतच्या मालमत्ता हस्तांतरण नोंदणी फी चा उल्लेख त्यामध्ये नसल्याने २५० /- फी चा दरही ही सभा निश्चित करत असुन हडको घराची मालमत्ता हस्तांतरण नोंद फी ५०० /- रूपये ऐवजी १००० /- रूपये करण्यात येत असुन मालमत्ता वारस नोंद फी रूपये ५०० /- ऐवजी रूपये १००० /- करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

इ) अपारंपारिक उर्जा स्त्रोत प्रकल्प तयार करून उभारणी करणे यासाठी रू.१ कोटी कर्ज व रूपये १ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सावेडी भुयारी गटार योजनेची अंमलबजावणी करणे अगत्याचे असुन यासाठी देखील १ कोटी कर्ज व तेवढयाच रक्कमेचा खर्च करण्याची तरतुद करण्यात यावी. सारसनगर उंच टाकीचा प्रस्ताव देखील कर्ज उभारणी करणे व त्यांच्या खर्चाची तरतुद करणे त्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच लालटाकी भागात टाकी बांधण्याच्या सुचनेस देखील मान्यता देण्यात येत आहे. त्याचे देखील आवश्यक प्रस्ताव तयार करावेत या करीता देखील मान्यता देण्यात येत असुन अग्निशामक वाहन खरेदीसाठी महानगरपालिका निधी मधुन न करता शासकीय कर्ज योजनेतुन रूपये ३० लक्ष पर्यंत कर्ज घेण्यास व तेवढयाच रक्कमेची खर्च करण्यासही सभा मान्यता देत आहे. तसेच अंदाजपत्रकातील दरवाढ नविन दर व बदलाच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारसीसह व सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार नमुद केलेल्या लेखाशिर्षकामध्ये वाढ ,घट व नविन लेखा शिर्षकासह मंजुरी देण्यात येत आहे. तसेच ही सभा शहर विकास दृष्टीने रस्ते मजबुतीकरण,डांबरीकरणसह शहरविकास सौंदर्यात भर पडेल यादृष्टीने सुशोभिकरणासह पुढील रस्ते सुचित करीत आहे.

१. गुलमोहोर रोड ऋणानुबंध अपार्टमेंट ते औरंगाबाद रस्त्यापर्यंत रूंदीकरण , मजबुतीकरण ,डांबरीकरण,सुशोभिकरण करणे.
२. सक्कर चौक ,आनंदधाम ते कोठी ते नगर - मनमाड रस्त्यांपर्यंत रूंदीकरण,मजबुतीकरण ,डांबरीकरण ,सुशोभिकरण करणे.
३. बागरोजा हडको पासुन बालिकाश्रम रोड ,निलक्रांती चौक ते सावेडी गावापर्यंत रस्त्यापर्यंत रूंदीकरण ,मजबुतीकरण ,डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.
४. लिंक रोड आयोध्यानगर कॉलनी ते जयहिंदनगर ते भुमकरघर ते दत्तचौकापर्यंत डांबरीकरण करणे.
५. माळीवाडा वेस ते आंबेडकर पुतळा पर्यंत डांबरीकरण करणे.

६. गुलमोहोर रोड व पाईपलाईन यांना कोहिनुर मंगल कार्यालयाचा मार्ग जोडणारा रस्ता रस्त्यापर्यंत रूंदीकरण ,मजबुतीकरण , डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.

७. नगर मनमाड रोड , प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौक रस्त्यापर्यंत रूंदीकरण ,मजबुतीकरण ,डांबरीकरण,सुशोभिकरण करणे.

८. एस.टी.स्टँण्ड छत्रपती शिवाजीमहाराज पुतळा ते आय.टी. आय. कॉलेज, बुरूडगांव पर्यंत रूंदीकरण ,मजबुतीकरण , डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.

९. बोल्हेगांव येथील गांधीनगर ते नगर मनमाड रोड रस्त्यापर्यंत रूंदीकरण , मजबुतीकरण ,डांबरीकरण करणे.

१०. एरिगेशन बंगला ते दर्गादायरा पर्यंत डांबरीकरण करणे.

११. व्हिडीओकॉन कंपनीजवळील यमुनानगर कडे जाणा-या रस्त्यावर पुल बांधणे.

१२. सारसनगर येथे पुल बांधणेसह सुशोभिकरण करणे.

अंदाजपत्रकाच्या तरतुदीच्या शेवटच्या रकान्यात योग्य त्या फेरफारासह तरतुद नमुद करून सन २००५-२००६ च्या मुळ अंदाजपत्रकास व सन २००४-२००५ च्या सुधारित अंदाजपत्रकासह व स्कुलबोर्ड हिश्श्यासह मान्यता देण्यांत येत आहे. खर्च मंजुर.

या अंदाजपत्रकाच्या ३०० प्रती छापणेस मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजुर.

सोबत : तक्ता.

सुचक : मा.श्री.सुरेश शेळके
अनुमादेक : मा.श्री.मनेष साठे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

***************************

---*---

मागील अपेक्षित उत्पन्न उदा. घरपट्टी वसुल होत नसेल तर त्याबाबत कोणांवर काय कारवाई होऊ शकते ते स्पष्ट करावे. बी.पी.एम.सी.ॲक्ट मध्ये महानगरपालिका कायद्यामध्ये जकात कर हा ऐच्छिक कर आहे. संकलीत कर कमी झाला पाहिजे. रेटेबल व्हॅल्यू कमी करणे बाबत ज्या ७२ हजार मिळकती आहेत त्यामध्ये रेटेबल व्हॅल्यु ४६ कोटीवर संकलीत कर १२ कोटी ४२ लाख आहे. ६ वर्षाची थकबाकी १०० कोटीवर जाते. तयामुळे घरपट्टीचे दर (रेट) कमी केल्यास १००% वसुली होऊ शकेल. त्यामध्ये १.४२ कोटी फक्त तुट होऊ शकेल.

सर्व विकास कामे बाजुला ठेवावी रेटेबल व्हॅल्यु ३०% कमी करावी. पाणीपट्टी १५०० वरुन ३०० ने कमी करुन १२०० रुपये करावी. पाणीपट्टी बाबत मागील वेळी केलेला ठराव शासनाने रद्द केलेला आहे.

अंदाजपत्रकामध्ये ४ कोटी शिल्लक दाखविलेले आहे. तयामध्ये कायनेटीक कंपनीचे पैसे कोर्टामध्ये शिल्लक दाखविलेले आहे. ते खर्च करता येणार नाही.

मा.श्री.सतिष मैड :- जड वाहतुकी बाबतचा प्रश्न निर्माण केला.

त्या नंतर खालील सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

श्री.गारुडकर, सौ.मुदगल, श्री.कृ.द.जाधव

मा.श्री.गिरवले :- घरपट्टी बाबत १९९५, १९९७ चा वाद न्यायालयात गेला आहे. त्याबाबत तोडगा काढावा व घरपट्टी कमी करावी. क्रीडा संकुलाबाबत तोडगा निघालेला नाही. संपुर्ण प्रोजेक्ट ताब्यात घ्यावा.

मा.श्री.शेख मुदस्सर :- घरपट्टी कमी होत नसेल तर फकीरवाड्याला परत ग्रामपंचायत करावी.

मा.श्री.अभय आगरकर :- अहमदनगर शहरातील पांजरापोळ ही संस्था अनाि अश्रित जनावरांचे पालन पोषण व संगोपनाचे कार्य करीत असल्याने सदर संस्थेस महानगरपालिकेच्या वतीने लावण्यांत येणारे टॅक्स लावु नयेत असे सांगितले.

शेवटी मा.महापौर यांनी आभार प्रदर्शन करतांना सांगितले की, ब-याच मा.सदस्यांनी अंदाजपत्रका बाबत उहापोह केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिप्रेत असलेल्या चांगल्या प्रथांचा पायंडा पाडलेला आहे. व सर्वांनी चांगले मुद्दे मांडलेले आहे. करीत जकात कर प्रस्ताव रद्द करण्यांत येत आहे. तयाचप्रमाणे सविस्तर बजेट सादर करुन मंजूर करावे असे श्री.दिपक सुळ यांनी सांगितले. त्यानंतर मा.महापौर, यांनी घरपट्टी २७% ऐवजी २१% करण्यांत येत आहे. तसेच सध्या असलेली पाणीपट्टी रुपये १५०० ऐवजी रु.१२००/- करण्यांत येत असुन सदरचे दर दि.१ एप्रिल २००५ पासुन लागु होतील असे सांगितले. मात्र आगरकर यांनी सांगितले की, सावेडी विभागात भुयारी गटारी योजनेसाठी तरतुद करण्यांत यावी. मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी व्यापारी वापर असेल ते क्षेत्र वगळुन मंदिर मस्जिद चर्च यांना घरपट्टी माफ करण्यांत यावी. चर्चा समाप्त.

खास सभा ठ.नं.१ दिनांक १९/२/०५ अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**अंदाजपत्रक ठराव :-** अ) दिनांक १ जुलै २००५ रोजी जकात कर अनुदान कपात होणार आहे. अनुदानातील ३३% कपात विचारात घेवून जकात कर लावणे अन्यायकारक ठरेल असे मा.सभागृहाचे मत आहे. त्यामुळे आगामी वर्षाकरीता जकात कर लागू करणे ही बाब अमान्य करणेत येत आहे.

ब) शहराची हद्दवाढ होवुन महानगरपालिकेत रुपांतर झालेले आहे. त्यामुळे आजूबाजूचे ग्रामीण जीवनमान असलेले क्षेत्र महानगरपालिकेस जोडले गेले आहे. औद्योगिक व व्यापार धंद्यातील उदासीनता बेरोजगारी अशा निरनिराळया समस्यांमुळे व महानगरपालिकेची जाचक घरपट्टी यामुळे दिवसेंदिवस नागरिकांमध्ये संस्थेविषयी नाराजीची भावना निर्माण झालेली आहे. याकरीता करयोग्य मूल्य भाडे ठरवितांना तत्कालीन नगरपालिकेने जास्तीचे दर विचारात घेवून कर रचना केलेली आहे. त्यामुळे मालमत्ता

करासोबत इतरही कराच्या मोठ्या रकमेची बिल नागरिकांनी दिली जात असून मोठ्या प्रमाणात शिक्षणकर व रोजगार हमी कराची मोठी रक्कम मा.शासनास भरावी लागते तसेच पूर्वीचे ठरविलेले करयोग्य मूल्य इतर महानगरपालिकेच्या तुलनेत देखील जास्तीत जास्त असल्याचे आढळून आलेले आहे. यास्तव सन २००५-२००६ या आर्थिक वर्षासाठी दि.१/४/२००५ पासून पूर्वी ठरविलेले करयोग्य मूल्य ३०% कमी करुन सुधारित करयोग्य मूल्यानुसार सर्व करांच्या आकारणी करणे आदी बाबतची कार्यवाही मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार करण्यांत यावी.

क) शहरात पाणीपट्टीचा १/२" घरगुती नळ कनेक्शन करीता रु.१२००/- सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाकरीता निश्चित करण्यात येत असुन अन्य पाणी पुरवठयाच्या पाणी पट्टीच्या दरात बदल करता येत नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये धार्मिक प्रयोजनासाठी वापरत असलेल्या मालमत्तेस सुट देण्यात देखिल ही सभा मान्यता देत आहे.

ड) मा.स्थायी समितीने मालमत्ता हस्तांतरासाठी शिफारस केलेल्या फी च्या दरास मान्यता देण्यांत येत असून ० ते १ लाख पर्यंतच्या मालमत्ता हस्तांतरण नोंदणी फी चा उल्लेख त्यामध्ये नसल्याने २५०/- रु. फी चा दर ही सभा निश्चित करीत असून हडको घरांची मालमत्ता हस्तांतरण नोंद फी रु.५००/- ऐवजी रु.१०००/- करण्यांत येत असून मालमत्ता वारस नोंद फी रुपये ५००/- ऐवजी रु.१०००/- करणेस मान्यता देण्यात येत आहे.

इ) अपारंपारिक उर्जा स्त्रोत प्रकल्प तयार करुन उभारणी करणे यासाठी रु.१ कोटी कर्ज व रु.१ कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सावेडी भुयारी गटार योजनेची अंमलबजावणी करणे अगत्याचे असून यासाठी देखिल रु.१ कोटी कर्ज व तेवढयाच रकमेची खर्च करण्याची तरतुद करण्यात यावी. सारसनगर उंच टाकीचा प्रस्ताव देखिल कर्ज उभारणी करणे व त्याच्या खर्चाची तरतुद करणे त्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच लालटाकी भागात टाकी बांधण्याच्या सुचनेस देखील मान्यता देण्यात येत असून त्यांचे देखिल आवश्यक प्रस्ताव तयार करावेत याकरीता देखिल मान्यता देण्यात येत असुन अग्निशामक वाहन खरेदी साठी महानगरपालिका निधीमधून न करता शासकीय कर्ज योजनेतून रु.३० लक्ष पर्यंत कर्ज घेण्यास व तेवढयाच रक्कमेची खर्च करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच अंदाजपत्रकातील दरवाढ, नविन दर व बदलाच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशीसह व सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार नमुद केलेल्या लेखाशिर्षामध्ये वाढ घट व नविन लेखाशिर्षासह मंजूरी देण्यात येत आहे. तसेच ही सभा शहरविकास दृष्टीने रस्ते मजबुतीकरण, डांबरीकरणासह शहर विकास सौंदर्यात भर पडेल या दृष्टीने सुशोभिकरणासह पुढील रस्ते सुचित करीत आहे.

१) गुलमोहर रोड ऋणानुबंध अपार्टमेंट ते औरंगाबाद रस्त्यापर्यंत रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण , सुशोभिकरण करणे.

२) सक्कर चौक- आनंदधाम ते कोठी ते नगरमनमाड रस्त्यापर्यंत रुंदीकरण मजबुतीकरण, डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.

३) बागरोजा हडको पासून बालिकाश्रम रोड निलक्रांती चौक ते सावेडी गावापर्यंत रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण व सुशोभिकरण करणे.

४) लिंकरोड आयोध्यानगर कॉलनी ते जयहिंदनगर ते भुमकर घर ते दत्तचौका पर्यंत डांबरीकरण करणे.

५) माळीवाडा वेस ते आंबेडकर पुतळा पर्यंत डांबरीकरण करणे.

६) गुलमोहोर रोड व पाईपलाईन रोड यांना कोहिनूर मंगलकार्यालया मार्गे जोडणारा रस्ता रुंदीकरण, मजबुतीकरण डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.

७) नगर-मनमाड रोड प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौक रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.

८) एस.टी.स्टॅण्ड छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते आय.टी.आय. कॉलेज ते बुरुडगांव पर्यंत रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण, सुशोभिकरण करणे.

९) बोल्हेगांव येथील गांधीनगर ते नगर-मनमाड रोड रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण करणे.

१०) इरिगेशन बंगला ते दर्गादायरा पर्यंत डांबरीकरण.

११) व्हीडीओकॉन कंपनीजवळील यमुना नगरकडे जाणा-या रस्त्यावर पूल बांधणे.

१२) सारसनगर येथे पूल बांधणेसह सुशोभिकरण करणे.

अंदाजपत्रकाच्या तरतुदीच्या शेवटच्या रकान्यात योग्य त्या फेरफेरासह तरतुद नमुद करुन सन २००५-२००६ च्या मुळ अंदाजपत्रकास व सन २००४-२००५ च्या सुधारित अंदाजपत्रकासह व स्कूलबोर्ड हिस्स्यासह मान्यता देण्यात आहे. खर्च मंजूर.

या अंदाजपत्रकाच्या ३०० प्रती छापणेस मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

ठराव बहुमताने मंजूर.

सोबत : तक्ता.

सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.

अनुमोदक : मा.श्री.मनेष साठे.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.